


# महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा वार्षिक अहवाल

## कालावधी :

## एप्रिल, २०११ ते मार्च, २०१२

# महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा वार्षिक अहवाल

## कालावधी :

## एप्रिल, २०११ ते मार्च, २०१२

## सन २०११-१२ चा वार्षिक अहवाल.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा माहे एप्रिल, २०११ ते माहे मार्च, २०१२ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करण्यात येत आहे.

श्री. तन्वीर फारुकी आणि श्री. तबरेज फारुकी, सदस्य, यांनी आसरा एसआरए को.ऑ.हौसिंग सोसायटी, लि. चे सदस्यत्व दिले जात नसल्याने काही सदस्यांनी केलेल्या आयोगाच्या कार्यालयात तक्रार केली होती. सदर तक्रारीबाबत दि. २ एप्रिल, २०११ रोजी आयोगाच्या कार्यालयात सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

पालघर तालुक्यातील देवखोप, शेलवली, सज्जनपाडा, सातपाटी या भागात आदिवासी ख्रिश्चन समाजाच्या लोकांवर धर्मांतर करत असल्याच्या कारणावरुन हल्ले करण्याच्या घटना घडल्या असल्याचे वृत्तपत्रीय बातम्यामध्ये प्रसिद्ध झाले आहे. त्या अनुषंगाने सदर बाबतीतील वस्तुस्थिती दर्शक अहवाल आयोगाच्या दि. २६ एप्रिल, २०११ च्या पत्रान्वये मागविण्यात आला.

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक समस्यांचे निराकरण करणेसाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग दि. २८ एप्रिल, २०११ अन्वये समिती स्थापन करण्यात आली.

मौलवी आमीर शफी आणि इतर यांनी मिल्लत स्कुल, जोगश्वरी यांनी सेवेतून कमी केल्याबाबत आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीबाबत आयोगाच्या कार्यालयामध्ये दि.२९ एप्रिल २०११ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी भाषेवर प्रभुत्व प्राप्त व्हावे व त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात येण्यासाठी मदत व्हावी याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली मराठी भाषा फौंडेशन वर्ग ही योजना वर्ष २०११-१२ मध्ये दि.१५ जून, २०११ ते दि. ३० एप्रिल, २०१२ या कालावधीमध्ये राबविण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना आयोगाकडील दि. ५ मे, २०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा. पंतप्रधान नवीन १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता राज्यस्तरीय सनियंत्रण समितीची आढावा बैठक मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ मे, २०११ रोजी आयोजित करण्यात आली होती.

कु. फातिमा अन्सारी, ८, हरिनिवास, सांताक्रुझ, मुंबई यांनी पोलीसांकडून तसेच बिल्डरकडून होणाऱ्या त्रासाबाबत आयोगाकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२६ मे, २०११ आणि दि. ३ जून, २०११ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

मुख्याध्यापक, सेंट मेरी हायस्कूल, माझगाव यांनी शिक्षण उपसंचालक, शिक्षण संचालनालय यांनी शाळेची मान्यता रद्द केल्याच्या आदेशाविरुद्ध दि.२९ मे, २०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२२ जून २०११ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

मुस्लिमांच्या शैक्षणिक व पर्यायाने आर्थिक मागासलेपणाच्या अनेक कारणापैकी प्रामुख्याने मुस्लिम बहुल भागात असलेल्या ऊर्दू शाळांमध्ये पायाभूत सुविधा व शैक्षणिक सुविधांचा असलेला दर्जा हे प्रमुख कारण मानले जाते. सद्यस्थितीत राज्यातील ऊर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये पायाभूत व शैक्षणिक

सुविधांच्या उपलब्धता/अनुपलब्धतेबाबतच्या स्थितीबाबत अधिकृत माहिती /आधार सामुग्री उपलब्ध नाही. सद्यस्थितीत शाळामधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा, विनाअनुदानित ऊर्दू माध्यमाच्या शाळांमधून शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम, विनाअनुदानित ऊर्दू माध्यमिक शाळांचा आर्थिक स्त्रोत, ऊर्दू माध्यमातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना इतर माध्यमातून शिक्षण घेतांना येणाऱ्या अडचणी इत्यादीबाबत शास्त्रीय सर्वेक्षण व अभ्यास करून या शाळांच्या शैक्षणिक विकासासाठी निश्चित स्वरुपाचे धोरण ठरविण्यासाठी शासनास सुयोग्य शिफारशी करण्याकरीता टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांच्यामार्फत सर्वेक्षण प्रकल्प हाती घेण्याच्या प्रस्तावास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.अविवि-२०११/प्र.क्र.४०/का-७, दि.१६ जून, २०११ अन्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्रदानित करण्यात आली आहे.

कु. मनजीत कौर, केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ, प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका यांनी दि.६ जुलै, २०११ रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ८ जुलै, २०११ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

दि. १८ जुलै ते २० जुलै, २०११ या कालावधीत संसदीय स्थायी समिती, महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्यावर आली होती. सदर दौऱ्यादरम्यान त्यांनी मा. पंतप्रधानाचा नवीन १५ कलमी कार्यक्रम व अल्पसंख्याकांसाठी बहुल क्षेत्र विकास कार्यक्रम याबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेसोबत बैठक आयोजित केली होती.

राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत सन २०११-१२ मध्ये राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना, संबंधित निधी मागणी प्रस्ताव व आयोगाशी संबंधित महत्वाच्या बाबीवर चर्चा करण्यासाठी मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांचेकडे दि.१५ सप्टेंबर, २०११ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग उपस्थित होते.

मौजे सुलीभंजन ता. खुलताबाद जि. औरंगाबाद येथील जागेची पाहणी करण्यासाठी अलिगड मुस्लिम विद्यापीठाचे कुलगुरु व त्यांचे प्रतिनिधी यांनी मंगळवार दि.२५ आक्टोबर, २०११ रोजी स्थळपाहणी केली. सदर भेटीदरम्यान अल्पसंख्याक विकास विभागाचे प्रतिनिधी म्हणून सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग हे उपस्थित होते. सदर स्थळपाहणी चा सर्वकष अहवाल आयोगाकडील दि.१४ नोव्हेंबर, २०११ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला.

मा. राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास विभाग यांनी दि.९ नोव्हेंबर, २०११ रोजी आढावा बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग उपस्थित होते.

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग आणि संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१७ नोव्हेंबर, २०११ रोजी सकाळी ११.०० वा. मदरसा शिक्षण व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासंदर्भात कार्यशाळा सहयाद्री राज्य अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.

दि. २० नोव्हेंबर, २०११ रोजी भांडुपमध्ये काही समाजविघातक व्यक्तींनी मुस्लिम बांधवाच्या भावना दुखावणारे छायाचित्र आणि मजकूर फेसबुक व सोशल नेटवर्कींग साईटवर प्रसिध्द केला. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या व सोनापूर, भांडूप याठिकाणी तणाव निर्माण झाला होता. याबाबत पोलिस विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडील दि. २१ नोव्हेंबर २०११ च्या पत्रान्वये मागविण्यात आला.

शासकीय सेवामधील अल्पसंख्याकांचे प्रमाण वाढावे याकरिता केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी अल्पसंख्याक समाजातील निवडक होतकरु १० उमेदवारांना राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या मुंबई / कोल्हापूर / नागपूर/ औरंगाबाद येथील प्रशासकीय प्रशिक्षण केंद्राकडून प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षणार्थी उमेदवारांना सन २०११-१२ पासून रु. २०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यास शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.अविवि-२०११/५१७/प्र.क्र.९५/११/का.९, दि. २० डिसेंबर, २०११ अन्वये मान्यता प्रदानित करण्यात आली आहे.

यशदा, पुणे डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्यामार्फत केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी अल्पसंख्याक समाजातील निवडक होतकरु १० उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येते. सदर १० उमेदवारांच्या प्रशिक्षणांसाठी एकरकमी रु. १० लक्ष एवढा निधी वितरित करण्यास शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि-२०११/प्र.क्र.६८/११/का.९, दि. ३० डिसेंबर, २०११ अन्वये मान्यता प्रदानित करण्यात आली आहे.

सोलापूर, भिवंडी जि. ठाणे, मालेगाव जि. नाशिक या शहरातील अल्पसंख्याक समाज विशेष करून मुस्लिम समाज रोजगारासाठी प्रामुख्याने यंत्रमाग आणि वस्त्रोद्योग या उद्योगावरच मोठया प्रमाणात अवंलबून आहेत. स्पर्धेमुळे येथील पांरपारिक उद्योग डबघाईला आला असून अशा परिस्थितीत रोजगाराचे स्थलांतर होऊ नये, येथील लोकांची उत्पादकता व आर्थिक स्तर वाढावा यासाठी या भागातील यंत्रमाग, वस्त्रोद्योग आणि तयार कापड उद्योगाला चालना देण्यासाठी या शहरामध्ये Textile and Apparel Manufacturing Clusters Development या विषयावर नॅशनल इन्स्टिटयूट फॉर मायक्रो, स्मॉल अँड मिडीयम इंटरप्रायझेस, निम्समे, युसूफगुडा, हैद्राबाद या संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याबाबतच्या प्रस्तावास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अविवि-२०१०/प्र.क्र.६/का-७, दि. २३ फेब्रुवारी, २०१२ अन्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि. १३ ते १४ मार्च, २०१२ या कालावधीमध्ये विज्ञान भवन, नवी दिल्ली, येथे राज्य अल्पसंख्याक आयोगाची वार्षिक परिषद आयोजित केली होती. सदर वार्षिक परिषदेस सदस्य आणि सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग उपस्थित होते.

मुस्लिम समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती, मुस्लिम समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्थितीवर परिणाम करणारे सुक्ष्म आर्थिक घटक (Marco Economic Factor) नागरीकरण आणि मुस्लिम समाजाचे स्थलांतर, विविध औद्योगिक क्षेत्रातील मुस्लिम समाजाची आर्थिक कार्य, ग्रामीण क्षेत्रातील मुस्लिम समाजाच्या व्यवसायाचा दर्जा जागतिकीकरणाचा मुस्लिम समाजाच्या उद्योगधंदयावर झालेला परिणाम बेरोजगारी, गरिबी इत्यादी बाबीवर सर्वेक्षणात्मक अभ्यास हाती घेणे आवश्यक असून अशा संशोधनपर अभ्यासातून प्राप्त होणाऱ्या माहिती व शिफारशीच्या आधारे मुस्लिम समुहाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी धोरण ठरविण्यास शासनास मदत होईल. याकरिता एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांनी मुस्लिम समाजाच्या आर्थिक, सामाजिक स्थितीबाबत संशोधन करण्याच्या सादर केलेल्या प्रस्तावास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०१२/प्र.क्र.५०/का-७, दि. ३१ मार्च, २०१२ अन्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्रदानित करण्यात आली आहे.

राज्यातील मुस्लिमांच्या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण आरोग्य निर्देशांक, मुस्लिमांमध्ये आढळून येणारे आजार, आरोग्य सुविधांची उपलब्धता, आरोग्य सुविधांचा वापर, आरोग्य सुविधा प्राप्त करण्याकरिता येणारा खर्च, आरोग्य केंद्रामध्ये मुस्लिमांचे प्रतिनिधीत्व इत्यादी बाबींचा अभ्यास करून त्याद्वारे मुस्लिमांची आरोग्य सद्यस्थिती जाणून आरोग्याच्या दर्जात सुधारणा घडवून आणण्यासाठी शासनास दिशादिग्दर्शन करण्याकरिता सर्वेक्षणात्मक अभ्यास हाती घेणे आवश्यक आहे. यातून प्राप्त होणाऱ्या माहिती व शिफारशीच्या आधारे राज्यातील मुस्लिमांच्या आरोग्यविषयक दर्जात सुधारणा घडवून आणण्यासाठी निश्चित स्वरुपाचे धोरण ठरविण्यास शासनास मदत होईल. या संदर्भात सेहत, मुंबई (CEHAT- Reserch Centre of Anusandhan Trust, Mumbai) यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पाच्या खर्चास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०१२/प्र.क्र.३३/का-७, दि.३१ मार्च, २०१२ अन्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्रदानित करण्यात आली आहे.

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक लोकसमुहाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासाकरिता विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मुस्लिम समाजातील माहिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजना अल्पसंख्याक महिलांपर्यत पोहचतात की नाही, योजना प्रभावीपणे मुस्लिम महिलांपर्यंत पोहोचण्यासंदर्भात सर्वेक्षणात्मक अभ्यास हाती घेणे आवश्यक असून अशा संशोधनपर अभ्यासातून प्राप्त होणाऱ्या माहिती व शिफारशीच्या आधारे राज्यातील मुस्लिम लोकसमुहातील माहिलांची आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी निश्चित स्वरुपाचे धोरण ठरविण्यास शासनास मदत होईल. या संदर्भात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांनी सादर केलेल्या सर्वेक्षणात्मक संशोधन प्रस्तावास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०१२/प्र.क्र.५०/का-७, दि.३१ मार्च, २०१२ अन्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्रदानित करण्यात आली आहे.

**अल्पसंख्याक कल्याण दिवस**

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार दरवर्षी १९ ते २५ नोव्हेंबर हा सप्ताह कौमी एकता सप्ताह म्हणून साजरा केला जातो. सदर कार्यक्रमाचा भाग म्हणून दि. २० नोव्हेंबर हा दिवस अल्पसंख्याक कल्याण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. अल्पसंख्याक कल्याण दिवस साजरा करतांना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून एकात्मता व बंधुभाव वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

त्यासाठी अल्पसंख्याक कल्याण दिवस साजरा करण्याच्या कार्यक्रमांमध्ये इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वी च्या विद्यार्थी/विद्यार्थीनीकरिता **भारतीय सण एकात्मतेचे प्रतिक** या विषयावर जिल्हा स्तरीय चित्रकला स्पर्धा, तसेच शालेय स्तरावर इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी च्या विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी **राष्ट्रीय एकता, धार्मिक वैविध्य आणि विकास** विषयावर मराठी, हिंदी, इंग्रजी व ऊर्दू या भाषांमध्ये निबंध स्पर्धा, प्रथम वर्षे ते तृतीय वर्षे मराठी, हिंदी, इंग्रजी आणि ऊर्दू माध्यमातुन शिकणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थीनीसाठी **२१ व्या शतकामध्ये जागतिकीकरण आणि विकासामुळे धार्मिक सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मता वाढण्यास मदत होईल काय ?** या विषयावर स्पर्धा आयोजित करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व शिक्षणाधिकारी यांना आयोगाकडील दि. ८ नोव्हेंबर, २०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

**अल्पसंख्याक हक्क दिवस**

संयुक्त राष्ट्रानी १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकृत करून प्रस्तुत केला आहे. त्यानुसार दरवर्षी जगभर दि. १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये देखील १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबरोबरच अल्पसंख्याकांचे हक्क, घटनेद्वारे अल्पसंख्याकांना असलेले अधिकार, देशाच्या अखंडतेसाठी आणि विकासासाठी असलेली सामाजिक सद्भावनेची गरज आणि अल्पसंख्याकांचा राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये समावेश करण्याची आवश्यकता याबाबत कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजाच्या सर्व घटकामध्ये जागृती करण्याबाबत तसेच तालुका मुख्यालयामध्ये आणि प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये कार्यक्रम आयोजित करून अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करून देणे अपेक्षित आहे त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत आयोगाकडील दि. २८ नोव्हेंबर, २०११ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलिस आयुक्त आणि सर्व पोलिस अधिक्षक यांना कळविण्यात आले होते.

**आसरा एसआरए को.ऑ.हौसिंग सोसायटी, लि. चे सदस्यत्व न देण्याबाबत काही सदस्यांनी केलेल्या तक्रारीबाबत दि. २ एप्रिल, २०११ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेली सुनावणी.**

| | |
|---|---|
| श्री. मोहम्मद शाहिद अनवरउल्हक,<br>श्रीम. असगरी बेगम,<br>श्री. नासीर उस्मान खान,<br>श्रीम. आसीया बेगम तन्जीम खान,<br>श्री. फरहान फारुकी/जन्वीर फारुकी<br>श्रीम. फतिमा एम इरफान शेख | वादी |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई<br>उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), मुंबई<br>अध्यक्ष/सचिव, आसरा एसआरए को.ऑ.हौसिंग सोसायटी लि.<br>आसरा इस्टेट, धारावी मेन रोड, धारावी | प्रतिवादी |

आसरा एसआरए को.ऑ.हौसिंग सोसायटी लि. चे सदस्यत्व दिले जात नसल्याबाबत काही सद्स्यांनी आयोगाच्या कार्यालयात तक्रार केली आहे. सदर तक्रारीवर दि. २ एप्रिल, २०११ रोजी आयोगाच्या कार्यालयात सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीकरिता श्री. मोहम्मद शाहिद अनवरउल्हक, श्रीम. असगरी बेगम, श्री. नासीर उस्मान खान, श्रीम. आसीया बेगम तन्जीम खान, श्रीम. फतिमा एम इरफान शेख आणि श्री. संदिप कंळबे, उपजिल्हाधिकारी (अति./निष्का) धारावी विभाग, मुंबई श्री. प्रताप पाटील सहा. निबंधक सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई शहर, श्री.पी.जी. भोईर, नायब तहसीलदार, एसआरए, श्री. एम.ए.शेख, उपअभियंता, एसआरए आणि आसरा एसआरए को. ऑ. हौ. सोसायटी लि. चे प्रतिनिधी श्री. आर राजमनी आणि राईकवाल उपस्थित होते.

सुनावणी दरम्यान अर्जदारांच्या वतीने खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आल्या.

१. आसरा संस्थेच्या अध्यक्ष यांनी सदर सोसायटीमध्ये ४ घरे मिळविली आहेत. तसेच इतरही पदाधिकाऱ्यांनी जास्तीची घरे मिळविली आहेत.

२. सदर गृहनिर्माण संस्था खाजगी जमिनीवर असून सदर जागेचे भूसंपादन २००१ मध्ये करण्यात आलेले आहे.

३. सदर भूखंडावरील सर्व झोपडया १९९५ पूर्वीच्या असून शासनाच्या झोपडपट्टयांना संरक्षण देण्याच्या धोरणानुसार पात्र आहेत. त्यामुळे सर्व अर्जदारांचा समावेश पात्रताधारकांच्या यादीमध्ये केला जाणे आणि सर्व नावे Annexure -२ मध्ये समाविष्ट केली जाणे आवश्यक आहे. मात्र उपजिल्हाधिकारी (अतिक्रमणे) यांनी बिल्डरचे हस्तक असल्यासारखे वागून विरोध करणाऱ्या अर्जदारांना अपात्र ठरवून त्यांचा समावेश Annexure -२ मध्ये केलेला नाही.

४. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरील सर्व भुखंड धारावी पुर्नविकास प्रकल्पातंर्गत म्हाडामार्फत विकसीत केला जाणे आवश्यक आहे. संबंधित उपजिल्हाधिकारी आणि एसआरए मधील अधिकारी यांनी बिल्डरसोबत संगनमत करून आसरा सह.गृहनिर्माण संस्थेच्या भुखंडाचा काही भाग धारावी पुनर्वसन प्रकल्पामधून वगळला आहे. तसेच जादा घनता असलेल्या झोडपट्टीचा भाग योजनतून अशा रितीने वगळण्यात आला आहे की, बिल्डरला त्याचा आर्थिक फायदा व्हावा.

५. काम सुरु करण्यासाठीची परवानगी (Commencement certificate) फक्त दोन इमारतीसाठीच असतांना आणि केवळ त्याखाली बाधित झोपडया तोडणे आवश्यक असतांना आणि अर्जदाराच्या झोपडया त्या खाली येत नसताना देखील आणि अर्जदाराच्या झोपडया बिल्डींग क्र. ५ खाली येत असतांना आणि बिल्डींग क्र. ५ साठी Commencement certificate दिले नसतांना फक्त अर्जदारांना बेघर करण्याची कार्यवाही जाणीवपूर्वक केली जात आहे.

६. बिल्डर आणि सोसायटीचे पदाधिकारी संगनमत करून अर्जदारांचा नळ पाणी पुरवठा बंद करतात तसेच ड्रेनेज बंद करतात.

७. उपजिल्हाधिकारी (अतिक्रमणे/निष्कासन) यांनी बिल्डर सोबत हात मिळवणी करून अर्जदारांना हेतुत: अपात्र ठरविले आहे जेणेकरुन बिल्डरला त्याचा फायदा होईल.

उपजिल्हाधिकारी, (अतिक्रमणे/निष्कासन) यांनी बिल्डर सोबत हातमिळवणी करुन अर्जदारांना हेतुत: अपात्र ठरविले आहे आणि अद्याप त्यांचे निष्कासन करण्यात आलेले नाही. तसेच भुसंपादनाबाबतची सविस्तर माहिती आणलेली नाही.

धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या कामासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १५६/२००६ आणि क्रमांक ६/२००७ अन्वये एक उच्चस्तरीय समिती गठीत केलेली आहे. सदर समिती धारावी मधील पुनर्विकासासंदर्भातील तक्रारीची चौकशी करणार असून मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार धारावी मधील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामधील अनियमिततांची चौकशी करून प्रकल्पांना मान्यता देणे किंवा मान्यता रद्द करणे आणि सदर प्रकल्पाबाबतची उचित कार्यवाही करण्याचे अधिकार मा. उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या समितीस प्रदान केलेले आहेत. सदर समितीचे कामकाज देखील सुरु झालेले आहे. आसरा कौ.हौ.सोसायटीचा समावेश धारावी पुनर्विकास प्रकल्पामध्ये करण्यासंबंधात सदर उच्चस्तरीय समिती फेरतपासणी करु शकते. अर्जदार सदर समितीकडे दाद मागू शकतात. अर्जदार अडचणीबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाद मागू शकतात. श्री. शेख, उपअभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी असे निदर्शनास आणले की, पात्रतेसंदर्भात अर्जदार उचित कागदपत्रे/पुराव्यासह सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण किंवा विभागीय महसुल आयुक्तांकडे अपील करु शकतात.

अर्जदाराचे म्हणणे आणि त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे उपजिल्हाधिकारी (अतिक्रमणे/निष्कासन) आणि उपअभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सादर केलेली माहिती आणि कागदपत्रे पाहता सकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदारांवर अन्याय करून त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

योजनेतून हेतुपरस्सर अपात्र ठरविण्यात आले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीला धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत मंजूर योजनेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले असल्याने आसरा कौ.हौ.सोसायटीचा प्रकल्प धारावी मध्ये येत असल्याने सदर प्रकल्प धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत विकसित करण्याचा निर्णय घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने गठीत केलेली समिती सक्षम आहे. अर्जदारांनी सदर समितीकडे तक्रार केली असल्याचे दिसून येते. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सदर भुखंडाचा देखील विकास करणे व्यापक जनहिताचा आणि अन्याय टाळण्याच्या दृष्टीने तसेच विकासकांना बेकायदेशीरपणे होणारी मदत टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

सदर बाबतीत करण्यात आलेली भूसंपादनाची कार्यवाही विकासकास फायदा होण्याच्या उद्देशाने केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. कारण विकासकासाठी भूसंपादन करून दिलेल्या भुखंडामधून जास्त घनता असलेल्या झोपडपट्टीचा भाग वगळण्यात आला आहे. यामध्ये शासकीय अधिकारी/ कर्मचा-याचे विकासकासोबतचे संगनमत स्पष्टपणे दिसून येते. सदर बाब झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या समितीच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. विकासकासोबत संगनमत करून विकासकाच्या फायद्यासाठी योजना मंजूर करण्यात आले आहे काय? याबाबतची सविस्तर चौकशी करून सदर बाब मा. उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या समितीच्या निदर्शनास आणणे देखील क्रमप्राप्त/आवश्यक ठरते.

भुसंपादन प्रक्रियेमध्ये सदर भागातील भुखंडाचा काही भाग समाविष्ट करण्यात आला आहे आणि काही भाग वगळण्यात आला आहे आणि जास्त घनता असलेला भाग केवळ कमी घनता असलेला भागच योजनेमध्ये समाविष्ठ करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रकल्प viable होण्यास आणि विकासकास फायदा होण्यास मदत होते. यावरुन भुसंपादन प्रक्रिया सचोटीने करण्यात आली नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

अर्जदारानी सादर केलेले म्हणणे आणि सादर केलेले पुरावे तसेच उपजिल्हाधिकारी अतिक्रमणे आणि उपअभियंता, झोपडपट्टी पुनर्सवन प्राधिकरण यांनी सादर केलेली माहिती व कागदपत्रे पाहता आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) आसरा एस.आर.ए. सह.गृहनिर्माण संस्थेसाठी करण्यात आलेली भुसंपादन प्रक्रिया सचोटीने पार पाडलेली दिसून येत नाही त्यामुळे सदर बाबतीत सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी फेरतपासणी करावी आणि उचित दुरुस्ती करावी.

(२) अर्जदारांच्या झोपडया १९९५ पूर्वीच्या असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे झोपडपट्टयांना संरक्षण देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अर्जदारांच्या झोपडया संरक्षणपात्र ठरतात. तेव्हा सदर बाबतीत सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी पुरावे तपासून अर्जदारांची पात्रता निश्चित करावी आणि पात्र अर्जदारांचा समावेश Annexure -२ मध्ये करावा.

(३) संबंधित विकासक किंवा इतर कोणाच्या ही पुढाकाराने अर्जदारांचा पाणीपुरवठा आणि इतर जोडण्या खंडित करू नयेत.

(४) ज्या इमारतीसाठी बांधकाम परवाना देण्यात आला आहे त्या इमारतीपुरतेच बांधकाम करण्यात येते किंवा कसे ? तसेच तेवढयाच प्रमाणात झोपडयांचे निष्कासन, तेही योग्य रीतीने झाले

आहे किंवा नाही ? याबाबत मुख्य कार्यवाही अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी त्वरित आढावा घेऊन आवश्यक ती कायदेशिर कार्यवाही करावी.

(५) आसरा एस.आर.ए. सह. निर्माण संस्थेच्या पुनर्वसन प्रकल्पाखालील भुखंड धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत (D.R.P.) विकसीत करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने तपासणी करून कार्यवाही करावी आणि उचित यंत्रणेकडे त्यासाठीचा प्रस्ताव पाठवावा.

(६) धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत (D.R.P.) संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सदर बाबतीत सर्व उचित कार्यवाही करावी आणि आवश्यकतेनुसार सदर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबतची माहिती सविस्तर वस्तुस्थितीसह मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १५६/२००६ आणि क्रमांक ६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीकडे आदेशासाठी सादर करावी.

**मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी, मुंबई येथील शिक्षकांनी त्यांना सेवेतुन कमी केल्याबाबत आयोगाकडे केलेल्या तक्रारीची दि. २९ एप्रिल, २०११ रोजी आयोजित सुनावणी**

| | |
|---|---|
| मौलवी अमीर शफी<br>श्री. मोहम्मद सिद्दीक मोहम्मद शफीक नुरी,<br>श्री. अबुलकलाम,<br>श्री. झीलूर-उर- रेहमान,<br>श्री. सईदु जमा,<br>श्री. अशरफ जमाल<br>श्री.सिद्दीक शैलिया | वादी |
| श्री. सिद्दीकभाई ट्रस्टी व अध्यक्ष मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी,<br>श्री. आफाक अहमद कुरेशी, प्रशासक | प्रतिवादी |

मौलवी अमीर शफी एस आणि इतर शिक्षक श्री. मोहम्मद सिद्दीक मोहम्मद शफीक नुरी, श्री. अबुलकलाम, श्री. झीलूर-उर- रेहमान, श्री. सईद दुजाजमा, श्री. अशरफ जमाल आणि श्री.सिद्दीक शैलिया यांनी आयोगाकडे दि. १८ एप्रिल, २०११ रोजीच्या पत्रानुसार मिल्लत स्कुल जोगेश्वरी, मुंबईच्या व्यवस्थापनाने त्यांना सेवेतुन कोणतीही नोटीस न देता काढून टाकल्याबाबत तक्रार केली आहे.

सदर तक्रारीवर दि. २९ एप्रिल, २०११ रोजी आयोगाच्या कार्यालयात सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणीकरिता मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी, मुंबईचे श्री. सिद्दीकभाई ट्रस्टी व अध्यक्ष मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी, श्री. आफाक अहमद कुरेशी, प्रशासक तसेच तक्रारदार मौलवी अमीर शफी एस आणि इतर शिक्षक श्री. मोहम्मद सिद्दीक मोहम्मद शफीक नुरी, श्री. अबुलकलाम, श्री. झीलूर-उर-रेहमान, श्री. सईदु जमा, श्री. अशरफ जमाल आणि श्री.सिद्दीक शैलिया हे उपस्थित होते.

सुनावणी दरम्यान अर्जदारांनी खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आणल्या.

१. शाळेच्या प्रशासनाने आठ शिक्षकांना कोणतीही नोटीस न देता आपल्या सेवांची शाळेसाठी आवश्यकता नसल्याने आपल्या सेवा खंडित करण्यात येत आहेत असे पत्र अर्जदारांना दिले आहे आणि सदर बाबतीत कुठलीही कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली नाही असे तक्रारीमध्ये नमूद केले आहे.

२. मौलवी मोहम्मद सिद्दिक मोहम्मद शफीक यांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केली आणि असे निदर्शनास आणले की, नियमित नियुक्ती दिलेल्या शिक्षकास बेकायदेशीरपणे सेवेतुन कमी केले आहे.

३. अर्जदाराचे वेतन दर महिन्याला बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते.

४. अर्जदार नियुक्तीपासून दररोज हजेरीपटावर सही करतात. विद्यार्थ्यांची संख्या पर्याप्त आहे आणि मुद्दाम शिक्षक कमी केले आहे.

५. संस्थेचे व्यवस्थापन कमी केले जात नाही. संस्थाचालक पक्षपातीपणाने व भेदभावपूर्ण वागणूक देत आहे.

६. संस्थेकडे मुबलक पैसा उपलब्ध आहे. भरपूर देणग्या (donation) देखील उपलब्ध होतात मात्र गुजराती भाषिक नसल्यामुळे अर्जदारांना कामावरुन कमी करण्यात येत आहे.

७. संस्थेमध्ये अनागोंदी कारभार चालला असून प्रत्येकजण टोलवाटोलवी करत आहे. शिक्षकांना सेवेतून काढून टाकण्याचा निर्णय कोणी दिला हे सांगण्यात येत नाही.

८. काही शिक्षकांच्या ८ ते ९ वर्षे सेवा झाल्यानंतर त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले ही बाब अन्यायकारक बाब आहे.

९. संस्थेमध्ये शैक्षणिक व्यवस्थापन व्यवस्थित नाही. नेहमी शिक्षणाचे माध्यम बदलण्यात येत आहे. त्यामुळे पालक विद्यार्थ्यांना मिल्लत हायस्कुलमधून काढून दुसऱ्या शाळेत प्रवेश घेत आहेत. शाळेचे व्यवस्थापन अत्यंत अयोग्य पध्दतीने चालले आहे.

१०. सिद्दीकभाई, ट्रस्टी हे इतर विश्वस्तांना आणि शिक्षकांना विश्वासात न घेता मनमानी पध्दतीने शाळेचा कारभार करीत आहेत.

११. व्यवस्थापनाच्या मनमानीविरुद्ध आवाज उठविल्यामुळे खोटी कारणे दाखवून आम्हाला सेवेतून कमी करण्यात आले आहे.

१२. सर्व शिक्षकांना सेवा अभिलेख आणि वैयक्तिक नस्ती संस्थेमध्ये ठेवले आहेत. त्यामध्ये आम्हाला कधीसुध्दा नोटीस दिली नाही. मात्र अचानक सेवेतुन कमी केल्याचे पत्र देण्यात आले आहे.

मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरीच्या व्यवस्थापनातर्फे श्री. सिद्दीकभाई, अध्यक्ष यांनी खालील बाबी निदर्शनास आणल्या.

१. शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली आहे त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांची शाळेला आवश्यकता नाही.

२. शिक्षकांना सेवाज्येष्ठतेनुसार कमी करण्यात आले आहे.

३. संस्थेची या शिक्षकांना पगार देण्याइतपत आर्थिक स्थिती भक्कम नाही त्यामुळे त्यांच्या सेवेची संस्थेस आवश्यकता नाही.

४. सदर शिक्षकांना जुन २०११ या महिन्यापर्यंत कमी करण्यात येणार नाही. त्यांना तीन महिन्याचे वेतन संस्थेमार्फत देण्यात येईल.

सुनावणी दरम्यान अर्जदार आणि व्यवस्थापनाचे प्रतिनिधी यांच्यामध्ये आपसात काही बाबींवरुन वाद होऊ लागल्याने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी अर्जदार तसेच मिल्लत हायस्कुलचे विश्वस्त यांना अशी सूचना केली की, त्यांनी आपसात चर्चा करुन परस्पर समन्वयाने या बाबतीत मार्ग काढावा आणि कमी केलेल्या शिक्षकांना इतर शाळांमध्ये समाविष्ठ करण्याचा प्रयत्न करावा. यासाठी दोन्ही पक्षांनी आपसात चर्चा करुन तोडगा काढण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली.

सदर बाबतीतील पुढील सुनावणी दि. १३ मे, २०११ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणीसाठी खालील व्यक्ती उपस्थित होते.

श्री. मोहम्मद आरीफ खान, श्री. आफाक अहमद कुरेशी, प्रशासक श्री. मोहम्मद सिद्दीक मोहम्मद शफीक नुरी, श्री. अबुलकलाम, श्री. झीलूर-उर- रेहमान, श्री. सईदु जमा, श्री. अशरफ जमाल हे उपस्थित होते.

सदर सुनावणी दरम्यान अर्जदारांनी असे निदर्शनास आणले की, अर्जदार चर्चेसाठी मिल्लत हायस्कुल येथे गेले होते आणि श्री. अशफाक खान, प्रशासक यांच्या कार्यालयामध्ये वाट पाहत राहिले. तथापि श्री. सिद्दिक भाई यांनी त्यांना चर्चेसाठी बोलाविले नाही त्यावेळेस त्यांना नाईलाजाने परत यावे लागले.

मा. अध्यक्ष यांनी संस्थेच्या प्रतिनिधीसोबत चर्चा करुन पुन्हा असे सुचित केले की, अर्जदार आणि व्यवस्थापन यांनी एकत्र बसून काही मार्ग निघतो का ते पहावे आणि आयोगास कळवावे. सदर बाबतीत अर्जदारांचे दोन प्रतिनिधी आणि विश्वस्तांचे दोन प्रतिनिधी मिळून आपसात चर्चा करुन तोडगा काढावा असे मा. अध्यक्षांनी सुचित केले.

तथापि सदर बाबतीत मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी यांच्या वतीने सदर शिक्षकांच्या मागणी संदर्भात कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचे अर्जदारांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. मिल्लत हायस्कुलच्या आस्थापनेवरील काही व्यक्ती महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाबाबत अनुद्‌गार काढत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आले.

सदर बाब अत्यंत खेदाची आहे. मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरीच्या व्यवस्थापनाने भविष्यात आयोगासंदर्भात आयोगाची बदनामी करणारे वक्तव्ये केल्यास व्यवस्थापनाविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल याची समज व्यवस्थापनास देण्यात येत आहे.

सदर बाबतीत आयोगाने घेतलेल्या सुनावण्या आणि मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी यांना वारवांर संबंधित कर्मचाऱ्यासोबत समेट करण्यासाठी दिलेली संधी याचा संस्थेने अनादर केल्याचे दिसून येते. संस्थेच्या विश्वस्तांना वारंवार संधी देऊन सदर प्रकरणी आपसात सर्वमान्या तोडगा काढण्याबाबत आयोगाने सुचित केले होते. तथापि सेवेतुन कमी केल्यामुळे हतबल झालेल्या गरीब असहाय्य शिक्षकांसोबत चर्चा करुन तोडगा काढण्यामध्ये आणि शिक्षकांना न्याय देण्यामध्ये संस्थेने अजिबात रस दाखविलेला नाही.

आयोगाने सुचित करुन देखील संस्थेने अर्जदाराच्या संदर्भात संस्थेमध्ये ठेवण्यात आलेले सेवाअभिलेख (उदा. हजेरीपट, वैयक्तिक नसत्या, वेतन देयके, कारणे दाखवा नोटीसच्या प्रती, वेतन बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा इ. प्रती) आयोगाकडे सादर केल्या नाहीत. यावरुन व्यवस्थापन मनमानीपणाने प्रशासन चालवित आहे असे दिसून येते.

सदरील संस्था शासकीय अनुदानातून पालकांनी दिलेल्या देणग्या आणि फी याद्वारे गोळा झालेल्या निधीमधून, देणगीदारांच्या निधीमधून उपलब्ध झालेल्या निधीवरच चालविण्यात येते. त्यामुळे सदर संस्था ही सार्वजनिक स्वरुपाची आहे आणि सार्वजनिक मालमत्ता ठरते. कोणत्याही सार्वजनिक संस्थेचे व्यवहार आणि प्रशासन पारदर्शक पध्दतीने, अन्यायरहित प्रक्रियेने आणि न्याय बुध्दीने होणे आवश्यक असून संस्था पारदर्शकता, न्यायबुध्दीने, सर्व सामजंस्याने चालविणे आवश्यक आहे. या बाबींची संवेदनशीलता आणि जाणिव व्यवस्थापनाने ठेवणे आवश्यक आहे. दुर्देवाने सदर बाबी मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरीच्या व्यवस्थापनाकडे दिसून आलेल्या नाहीत.

संस्थेच्या व्यवस्थापनाने आयोगासमोर अशी ग्वाही दिली की, आवश्यकता पडल्यास कमी केलेल्या शिक्षकांमधून सेवाज्येष्ठतेनुसार शिक्षकांना सामावून घेतले जाईल. तथापि काही अर्जदारांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठ असलेल्या दोन गुजराती भाषिक शिक्षकांना संस्थेने पुनश्च: कामावर घेतले होते आणि इतर शिक्षकांनी सदर बाबतीत हरकत घेतल्यांनतरच पुन्हा त्यांना कमी करण्यात आले.

ही बाब पाहता मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरीचे व्यवस्थापन त्यांच्या शिक्षकांमध्ये गुजराती भाषिक आणि इतर भाषिक असा भेदभाव करीत आहे आणि शिक्षकांना भेदभावपुर्ण वागणूक देत आहेत असे स्पष्ट होते. सदर बाब भारतीय राज्यघटनेमध्ये दिलेल्या मुलभूत हक्काचा भंग करणारी आहे. भेदभावपुर्ण वागणूक देणे ही बाब कायद्याचा भंग करणारी शिक्षेस पात्र ठरणारी आहे. संस्थेच्या व्यवस्थापनाने सार्वजनिक मार्गानी मिळविलेल्या निधीचे आणि मालमत्तेचे विश्वस्त म्हणून काम करणे अपेक्षित आहे. तथापि सदरील व्यवस्थापन संस्थेच्या मालमत्तेला खाजगी मालमत्ता समजून मनमानी पध्दतीने कारभार करीत आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे.

व्यवस्थापनाने कमी केलेल्या शिक्षकांना कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आलेली नाही किंवा त्यांच्या बाबतीत कसल्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही. बचावाची अथवा आपली बाजू मांडण्याची संधी अर्जदारांना देण्यात आलेली नाही आणि त्यांना हजेरीपटावर सही करण्यास मनाई करण्यात आली. तसेच अर्जदारांना त्यांच्या सेवा कमी करण्याचे पत्र हजेरीपटावर स्वाक्षरित करतांना देण्यात आले. सदर पत्रामध्ये कोणत्या अधिकारान्वये सेवा कमी करण्यात आलेल्या आहेत आणि कोणत्या कारणासाठी कमी करण्यात आले आहेत ? हे देखील नमूद करण्यात आलेल नाही. संस्थेच्या प्रशासनाने सदर पत्र निर्गमित केले आहे.

शासकीय/निमशासकीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास प्रशासक म्हणून नेमण्यात आले आहे आणि अशा प्रकारचे सदर पत्र स्वाक्षरित केले आहे. अशा शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास सदर शिक्षकांना सेवेतून कमी करण्याचा अधिकार संस्थेने दिला असल्याचे कोठेही नमूद नाही. त्यामुळे सदर शिक्षकांना सेवेतून कमी करण्याची संस्थेची सदरील कृती घाईघाईने आणि मनमानी पध्दतीने केलेली बेकायदेशीर कृती ठरते.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता आयोग खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी, मुंबईच्या व्यवस्थापनाने मौलवी आमीर शफी एस आणि इतर ८ शिक्षकांना सेवेतून कमी करण्यासंदर्भात निर्गमित केलेले पत्र/आदेश बेकायदेशीर असल्याने रद्द करण्यात यावेत.

२. सदर शिक्षकांना मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी अथवा संस्थेच्या व्यवस्थापनाच्या इतर संस्थांमध्ये त्वरित समायोजित करण्यात यावे.

३. मिल्लत हायस्कुल, जोगेश्वरी या संस्थेस सदर अर्जदार शिक्षकांना समाविष्ट करुन घेणे शक्य नसल्यास त्या संदर्भातील सविस्तर लेखी अहवाल संस्थेच्या लेखापरिक्षण झालेल्या लेख्यांसह ३० दिवसांत आयोगाकडे सादर करावा.

४. उपरोक्त (२) च्या अनुषंगाने अर्जदार शिक्षकांना संस्थेमध्ये सामावून घेणे शक्य नसल्यास सेवेतून कमी केलेल्या प्रत्येक शिक्षकास संस्थेने त्यांच्या निधीमधून ६ महिन्याचे पुर्ण वेतन आगाऊ स्वरुपात अदा करुन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करावे.

**कुमारी फतिमा अन्सारी, रा.८ हरिनिवास, सांताक्रुझ, मुंबई यांनी पोलिसांकडून तसेच बिल्डरकडून होणाऱ्या त्रासाबाबत आयोगाकडे केलेल्या तक्रारीची दि. २६ मे, २०११ आणि दि.३जुन, २०११ रोजी आयोगाच्या कार्यालयात घेण्यात आलेली सुनावणी.**

श्रीमती फतिमा अन्सारी, रा.८ हरिनिवास, सांताक्रुझ, मुंबई व श्रीमती जेनेट अन्सारी यांनी मे. शुभम डेव्हलपर्स आणि श्री. साखरकर, कनिष्ठ अभियंता, बृहनमुंबई महानगरपालिका आणि श्री. जे.एम.पवार पोलीस निरिक्षक, वाकोला पोलीस ठाणे यांच्या विरुद्ध महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे तक्रार केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयामध्ये दि.२६ मे, २०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणीमध्ये खालील व्यक्ती/अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| श्रीमती फातिमा अन्सारी<br>श्रीमती जेनेट अन्सारी | } | अर्जदार |
| श्री. जितेंद्र विष्णू पवार, पोलीस निरिक्षक, वाकोला पोलीस ठाणे<br>श्री. किरण आचरेकर, उपायुक्त, बृहनमुंबई महानगरपालिका, मुंबई. | } | गैरअर्जदार |

सुनावणी दरम्यान अर्जदाराने खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आणल्या.

१. गेल्या पाच महिन्यापासून मे. शुभम डेव्हलपर्स हे कु. फातिमा अन्सारी रहात असलेल्या जागेवर ताबा सांगत असून त्यावर बेकायदेशीरपणे boundary wall चे बांधकाम सुरु केले आहे. मे. शुभम डेव्हलपर्स यांच्याकडून कु. फतिमा अन्सारी यांना त्यांचे रहाते घर रिकामे करण्याकरिता त्रास दिला जात आहे.

२. सदर बिल्डर विरोधात वाकोला पोलीस ठाण्यात तक्रार करायला गेले असता त्यांची तक्रार नोंदवून न घेता उलट कु. फातिमा अन्सारी यांच्या आई श्रीमती जेनेट अन्सारी यांना पोलीस कर्मचाऱ्यांनी ओढत बाहेर काढले. तेव्हा श्रीमती झेनेट अन्सारी जमीनीवर बेशुध्द पडल्या. श्रीमती जेनेट अन्सारी यांना त्यावेळेस कोणतीही वैद्यकीय मदत देण्यात आली नाही. त्यामुळे श्रीमती जेनेट यांना Hyper tension झाल्याने अर्जदाराने नंतर त्यांना दवाखान्यात दाखल करुन औषधोपचार केला.

३. अर्जदार घरात एकटी असतांना दि.६ एप्रिल २०११ रोजी सकाळी ११.३० वा. बिल्डरचे प्रतिनिधी आणि त्यांच्या काही सहकाऱ्यानी त्यांना मानसीक त्रास दिला आणि तळमजल्यावरील अर्जदाराचे घर पाडून टाकण्याचा प्रयत्न केला व धमकावले.

४. अर्जदार आणि त्यांच्या आईच्या तक्रारी ऐकूण न घेता वाकोला पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांनी त्यांना मारहाण केली तसेच अपमानास्पद वागणूक दिली.

५. अर्जदाराची आई पोलीस स्टेशनमध्ये बेशुध्द पडली असतांना देखील पोलीसांनी काहीही मदत केली नाही किंवा वैद्यकीय उपचार केले नाहीत.

६. दि.८ एप्रिल, २०११ रोजी बळजबरीने अर्जदाराच्या घरातील सामान बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आणि बृहनमुंबई महानगरपालिका आणि पोलीस अधिकारी यांनी त्यासाठी संगनमत केले होते.

७. दि. १५ एप्रिल, २०११ रोजी श्री. धिरेन गाला बिल्डर आणि वाकोला पोलीस स्टेशनचे अधिकारी यांनी येऊन एकटी घरात असतांना अर्जदाराचे रहाते घर तोडून सामान रस्त्यावर फेकले आणि बेघर केले.

८. अर्जदार आणि त्याची बहिण कु. स्टेसी वाझ यांना पोलीस कर्मचाऱ्यांकडून मारहान करण्यात आली आणि त्यांच्या मोबाईलमध्ये record केलेले अत्याचार delete करण्यास भाग पाडण्यात आले. तसेच त्यांना अटक करुन न्यायालयापुढे हजर करण्यात आले.

९. कु. फतिमा अन्सारी यांनी असेही नमूद केले की, त्यांना कुठलीही पुर्वसूचना न देता तसेच राहण्याची पर्यायी व्यवस्था न करता त्यांचे राहते घर पाडण्यात आले. तसेच त्यांच्या शेजारी रहात असलेल्या लोकांना दरमहा रु.१०,०००/- ते १८,०००/- भाडे देण्यात आले असून ११ महिन्याचे भाडे त्यांना आगाऊ देण्यात आले आहे. तसेच कु. फातिमा अन्सारी यांना मे. शुभम डेव्हलपर्स यांनी दरमहा रु.४०००/- भाडे देण्यास तयार असल्याचे नमूद केले. शुभम डेव्हलपर्स बिल्डरने इतर रहिवाश्यांना २३५ चौ. फुट पेक्षा जास्त कार्पेट एरिया दिल्याचे नमूद केले आहे.

१०. विकासक (शुभम डेव्हलपर्स) ताब्यात असलेल्या क्षेत्रफळापेक्षा फार कमी क्षेत्रफळ देत आहे.

सदर सुनावणीसाठी आलेल्या श्री. किरण आचरेकर, उपायुक्त, बृहनमुंबई महानगरपालिका, परिमंडळ ३ यांनी खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आणल्या.

१. सदर बिल्डींग धोकादायक असल्याने वर्ष २००२ पासून सदर इमारतीमधील रहिवाशांना नोटीसेस देण्यात आल्या होत्या.

२. कु. फातिमा अन्सारी यांना घर रिकामे करण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली.

३. सदर धोकादायक इमारत पाडण्याची कार्यवाही कायदेशीररित्या करण्यात आली होती.

४. पुनर्रचित इमारतीचे नकाशे Building proposal विभागाकडून मंजूर करण्यात आले आहेत.

वाकोला पोलीस स्टेशनचे अधिकारी श्री. जिंतेद्र विष्णू पवार, पोलीस निरिक्षक, वाकोला पोलीस ठाणे यांनी खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आणल्या.

१. बृहनमुंबई महानगरपालिकेने सदर इमारत धोकादायक असल्याने पोलीसांकडून सदर इमारत पाडण्याकरिता रितसर पोलीस बळाची मागणी केली होती.

२. अर्जदाराला घर रिकामे करण्याकरिता सांगीतले असता त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकारी तसेच पोलीसांना शिवीगाळ केली. याबाबत त्यांच्यावर कलम ३५३,३२२, ५०४, ५०६, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फक्त कायदेशीर कार्यवाही करण्यात आली.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अर्जदाराचे म्हणणे अबाधित ठेवणे महत्वाचे असल्याने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी पुढील सुनावणीकरिता संचालक, इमारत बांधकाम तसेच मे. शुभम डेव्हलपर्स यांना विषयाशी निगडीत सर्व कागदपत्रासह हजर राहण्याबाबत आदेश दिले होते.

दि. ३ जुन, २०११ रोजी दुपारी ३.०० वा. आयोगाच्या कार्यालयामध्ये पुनश्च सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीसाठी खालील अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्री. आर. बी. हरदास, | उपमुख्य अभियंता, बृहनमुंबई महानगरपालिका इमारत बांधकाम |
| श्री. मिनेश पिपंले, | सहाय्यक आयुक्त, बृहनमुंबई महानगरपालिका एच/पूर्व |
| श्री. आर.जी. परदेशी | वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाकोला पोलीस ठाणे. |
| श्री. जे.व्ही. पवार, | पोलीस निरिक्षक, वाकोला पोलीस ठाणे. |
| श्री. धिरेन गाला, | मे. शुभम डेव्हलपर्स |
| ॲड एस.जी. सुराणा | मे. शुभम डेव्हलपर्स यांचे वकील |
| श्रीमती फातिमा अन्सारी | अर्जदार |
| श्रीमती जेनेट अन्सारी | अर्जदार |

मुंबई महानगर पालिकेचे श्री. आर.बी. हरदास, उपमुख्य अभियंता, इमारत बांधकाम यांनी पुर्नविकासासाठी Incent of Development देण्यात आले आहे मात्र अद्याप C.C. देण्यात आली नाही. नकाशे मंजूर करण्यात आले आहेत असे नमूद केले.

मे. शुभम डेव्हलपर्स यांनी सदर सुनावणी संदर्भात खालीलप्रमाणे म्हणणे आयोगाकडे सादर केले.

१. हरि निवास ही इमारत मे. शुभम डेव्हलपर्स यांच्या मालकीची आहे.

२. मे. शुभम डेव्हलपर्स ने सदर इमारतीच्या पुनर्बांधणीचा निर्णय घेतला आहे.

३. इमारतीमधील सर्व भाडेकरुनी पुनर्बाधणीसाठी संमती दिली आहे. अर्जदार कु.फातिमा अन्सारी/श्रीमती जेनेट अन्सारी यांनी संमती दिलेली नाही.

४. सर्व भाडेकरुनी गाळे रिकामे करुन दिले आहेत फक्त अर्जदार श्रीमती फातिमा अन्सारी यांनी गाळा रिकामा करुन दिलेला नाही.

५. पुनर्रचित इमारतीमध्ये सर्व भाडेकरुंना २३५ चौ. फुट कार्पेट एरिया देणार आहेत. तसेच इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यत सर्व भाडेकरुंना पर्यायी निवासी व्यवस्थेसाठी भाडे देणार आहे.

६. अर्जदारासाठी एक निवासी गाळा राखीव ठेवण्यात आला आहे.

७. अर्जदाराने मा. मुंबई हायकोर्ट आणि मा. दिवाणी न्यायालय, दिंडोशी, गोरेगाव, मुंबई न्यायालयामध्ये दावे दाखल केलेले असून सन्मा. न्यायालयानी सदर बाबतीत अद्याप कोणतेही restrain करणारे आदेश दिलेले नाही. तसेच अर्जदारास relief दिलेली नाही.

८. मे. शुभम डेव्हलपर्स यांनी सर्व भाडेकरुंना / राहणाऱ्या लोकांना समान राहण्याची व्यवस्था केली. परंतु रु.क्र.८ यासाठी तयार नाही.

९. कु. फातिमा अन्सारी यांनाही इतर रहिवाश्यांना दिलेल्या सुविधा देण्यास मे. शुभम डेव्हलपर्स तयार आहे. तसेच कु. फातिमा अन्सारी / जेनेट अन्सारी यांनी विविध कोर्टामध्ये केलेल्या केसेस परत घेतल्यास त्यांचेसोबत मे. शुभम डेव्हलपर्स कडून करारनामा करण्यात येईल असे ॲड सुराणा यांनी मे. शुभम डेव्हलपर्स यांच्या  वतीने आयोगाच्या निदर्शनास आणले.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अर्जदारासाठी पर्यायी निवासी व्यवस्था केली जाणे आणि अर्जदारास पुनर्रचित इमारतीमध्ये गाळा मिळण्याचा हक्क अबाधित राहणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे.

अर्जदारास पोलीस किंवा इतर यंत्रणाद्वारे अत्याचार झाला असल्यास त्याबाबत अर्जदार न्यायसंस्थेकडे अर्ज करुन दाद मागू शकतात. अर्जदाराच्या हक्काचा विचार करतांनाच इतर भाडेकरु ज्यांनी घरे रिकामे केली आहेत त्यांच्या हक्काचा देखील विचार केला जाणे आवश्यक आहे आणि त्यासाठी इमारतीची पुनर्बांधणी लवकर होणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

**आदेश**

१. मे. शुभम डेव्हलपर्स यांनी इतर रहिवाश्याप्रमाणेच कु. फातिमा अन्सारी / श्रीमती जेनेट अन्सारी यांना पुनर्बाधणी पुर्ण होईपर्यंत दरमहा रु.१२,०००/- भाडे द्यावे अथवा इमारतीची पुनर्बांधणी पुर्ण होईपर्यंत इतर भाडेकरुंना देण्यात आल्यानुसार अर्जदारास देखील निवासासाठी पर्यायी जागा देण्यात यावी.

२. मे. शुभम डेव्हलपर्स यांनी कु. फातिमा अन्सारी / श्रीमती जेनेट अन्सारी यांच्यासोबत इमारतीच्या पुनर्बांधणीची संदर्भात इतर रहिवांश्यासोबत केल्यानुसार त्वरित करारनामा करण्यात यावा.

३. कु. फातिमा अन्सारी / श्रीमती जेनेट अन्सारी यांनी मे. शुभम डेव्हलपर्स सोबत करारनामा करुन घ्यावा आणि पुनर्बांधणीसाठी सहकार्य करावे.

४. ज्याप्रमाणे इतर रहिवाश्यांना २३५ चौ. फुट एवढा कार्पेट एरिया देण्यात आला आहे त्याचप्रमाणे श्रीमती जेनेट अन्सारी यांना देखील बांधकाम क्षेत्रफळ देण्यात यावे तसेच त्यांच्यासाठी एक निवासी सदनिका राखीव ठेवण्यात यावा.

५. श्रीमती जेनेट अन्सारी यांनी विविध न्यायालयामध्ये दाखल केलेले दावे परत घेतल्यास अथवा त्या संदर्भातील consent terms दाखल करुन दावे संपुष्टात आणल्यास सदर आदेश लागू होतील अन्यथा सन्मा. न्यायालयाच्या निकालाअंती सन्मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

**मुख्याध्यापक सेंट मेरी हायस्कुल, माझगाव यांनी शाळेची मान्यता रद्द केल्याबाबत आयोगाकडे केलेल्या तक्रारीची दि. २२ जुन, २०११ रोजी आयोजित सुनावणी.**

**अर्जदार**

| | |
|---|---|
| (१) फादर बाप्टिस्ट पिंटो, | मुख्याध्यापक, सेंट मेरी हायस्कुल, माझगाव |
| (२) डॉ. फेझर मस्कारेन्हा, | प्राचार्य, सेंट झेवीअर्स कॉलेज, मुंबई |
| (३) श्री. रमेश मिस्त्री, | सदस्य, पेरेंट टिचर्स असोसिएशन, सेंट मेरी हायस्कुल |
| (४) श्री. शिवलकर | सदस्य, पेरेंट टिचर्स असोसिएशन, सेंट मेरी हायस्कुल |

**गैर अर्जदार**

| | |
|---|---|
| (५) श्री. सुनील चौहान, | शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग |
| (६) श्री. बी.डी.पुरी, | शिक्षण निरिक्षक, दक्षिण मुंबई |

विभागीय उपसंचालक, शालेय शिक्षण, मुंबई विभाग यांनी सेंट मेरी हायस्कुल, माझगाव या शाळेची मान्यता रद्द केल्याबाबत फादर बाप्टिस्ट पिंटो, मुख्याध्यापक, सेंट मेरी हायस्कुल, माझगाव यांनी दि. २९ मे, २०११ च्या पत्रान्वये विभागीय उपसंचालक, शालेय शिक्षण, मुंबई विभाग यांच्या आदेशाविरुद्ध महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे दि.२२ जुन, २०११ रोजी दु.३.०० वा. आयोगाच्या कार्यालयामध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी त्यांच्याकडील आदेश क्र. शिऊस/मा १४/मा.का./दक्षिण/२०१०-२०११/१५४५५-६०/दि.२४ मे, २०११ अन्वये सेंट मेरी हायस्कुल, माझगाव, मुंबई या शाळेची मान्यता रद्द करण्याबाबतचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाविरुद्ध अर्जदारांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे अपिल केले आहे.

सुनावणी दरम्यान अर्जदारांनी पुढील बाबी आयोगाच्या निदर्शनास आणल्या.

१. सेंट मेरी हायस्कुल, माझगाव गेल्या ७५ वर्षापासून माझगाव येथे सुरु आहे. सदर शाळेमध्ये जवळपास १ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी पारित केलेल्या शाळेची मान्यता रद्द करण्याबाबतचे आदेश हे संस्थेवर तसेच विद्यार्थ्यांवर आणि पालकावर अन्यायकारक आहेत.

३. शाळेमध्ये कुठल्याही प्रकारची बेकायदेशीर कामे केली जात नाहीत.

४. शाळेमध्ये विद्यार्थ्यांकरीता सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

५. शाळेविरुद्ध तक्रार केलेल्या तक्रारदार श्री. नानासाहेब कुटेपाटील यांचा मुलगा नववी मध्ये नापास झाला होता. त्याला पास करुन घेण्याचा हट्ट त्याचे वडील श्री.नानासाहेब कुटेपाटील यांनी केला होता. परंतु त्या व्यवस्थापनाने नकार दिल्याने श्री. पाटील यांनी शाळेविरुद्ध माहिती अधिकार अंतर्गत वारवांर माहिती मागवून शाळेला त्रास देण्यास सुरवात केली आणि त्यांनी शाळेविरुद्ध तक्रारी केल्या आहेत.

६. शिक्षण विभागाने पालक/शिक्षक संघटना, सेंट मेरी हायस्कुल, यांना विश्वासात न घेता शाळेविरुद्ध कार्यवाही करण्यात आली आहे.

सुनावणी दरम्यान विभागीय उपसंचालक, शालेय शिक्षण, मुंबई विभाग यांच्या वतीने श्रीमती बा.आ.सांवत, अधिक्षक, विभागीय उपसंचालक, शालेय शिक्षण, मुंबई विभाग यांचे कार्यालय यांनी शाळेची मान्यता काढून घेण्याबाबत दिलेल्या आदेशासंदर्भात खालीलप्रमाणे काही बाबी आयोगाच्या समोर नमूद केल्या.

(१) सेंट मेरी हायस्कुल, माझगांव मुंबई या शाळेने संस्थेची अधिकृत कार्यकारणी व संस्थेच्या अधिकृत पदाधिका-यांची यादी खुलासा सोबत सादर केलेला नाही.

(२) शाळा विद्यार्थ्यांकडून नियमबाहय देणग्या आणि विविध फंड गोळा करते आणि त्या बाबत केलेला खुलासा चुकीचा आहे. तसेच रू. १,४५,७०,८८१/- पालक व विद्यार्थ्यांकडून गोळा केल्याचे कार्यालयाच्या तपासणीमध्ये सिध्द झाले आहे.

(३) शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी असलेले शौचालय व मुताऱ्या हया विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात अपुऱ्या आहेत.

(४) शैक्षणिक सुविधा अपुऱ्या असल्याचे दिसून येते.

पालक-शिक्षक संघटनेतर्फे श्री. रमेश मिस्त्री आणि श्री. शिवलकर यांनी पालकांची बाजू मांडण्यासाठी परवानगी मागीतली.

आयोगाने पालकांना बाजू मांडण्यास मान्यता दिली. शाळेसाठी श्रीमती एम्मी फर्नांडिस यांना स्वाक्षरीसाठी प्राधिकृत करण्यात यावे अशी पालकांनी विनंती केली.

सुनावणी दरम्यान दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले सदर बाबतीतील कागदपत्रांच्या प्रती विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या कार्यालयाकडून आयोगास सादर करण्यात आलेल्या नाहीत. याबद्दल आयोगाने नापसंती व्यक्त केली. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी पुढील सुनावणीसाठी व्यक्तीश: हजर राहून सर्व कागदपत्रे सादर करावीत आणि नंतरच सुनावणी आयोजित करण्यात यावी असे निर्देशित केले.

त्यानुसार पुढील सुनावणी २७ जुन, २०११ रोजी आयोजित करण्यात आली होती.

सदर सुनावणीसाठी खालील व्यक्ती/अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| (१) श्री. पुरी बी. डी., | शिक्षण निरिक्षक, दक्षिण मुंबई |
| (२) श्री. देशमुख एम.के. | शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, मुंबई |
| (३) श्रीमती कदम एस.आर | उपशिक्षणाधिकारी,बृहनमुंबई महानगरपालिका, मुंबई |
| (४) फादर बाप्टिस्ट पिंटो, | मुख्याध्यापक, सेंट मेरी हायस्कुल, माझगाव |
| (५) डॉ. फेझर मस्कारेन्हा, | प्राचार्य, सेंट झेवीअर्स कॉलेज, मुंबई |
| (६) श्री. रमेश मिस्त्री, | सदस्य, पेरेंट टिचर्स असोसिएशन, सेंट मेरी हायस्कुल |
| (७) श्री. शिवलकर | सदस्य, पेरेंट टिचर्स असोसिएशन, सेंट मेरी हायस्कुल |

सदर सुनावणी दरम्यान विभागीय उपसंचालक, मुंबई विभाग यांनी खालील मुद्दे उपस्थित केले.

(१) सदस्य, पेरेंट टिचर्स असोसिएशन संदर्भात निवडणूका झालेल्या नसून जुनीच समिती कार्यरत आहे.

(२) संस्थेस शौचालय व मुताऱ्या या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात अपुऱ्या आहेत.

(३) संस्थेची जागा भाडयाची असून त्यांचा करार संपुष्टात आलेला आहे.

श्री. रमेश मिस्त्री आणि श्री. शिवलकर सदस्य, पेरेंट टिचर्स असोसिएशन, सेंट मेरी हायस्कुल यांनी असे नमूद केले की, पेरेंट टिचर्स असोसिएशन, स्थापन करण्यात आले असून शाळेमध्ये रितसर त्यांच्या बैठका नियमितपणे होत असतात.

सेंट मेरी हायस्कुल, माझगाव मुंबई यांच्या व्यवस्थापनाने खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आणल्या.

(१) शाळेमध्ये बारा मुताऱ्या व नऊ शौचालय असून विद्यार्थ्यांच्या प्रमाणात पर्याप्त आहेत.

(२) शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून हेतुपुरस्सरपणे अल्पसंख्याक व्यवस्थापनाच्या शाळेस त्रास देण्यात येत आहे.

(३) शाळेमध्ये जमा असलेल्या निधिबाबत आर्थिक गुन्हे प्रकटीकरण शाखा, पोलिस आयुक्तालय, मुंबई यांच्याकडून तपासणी करण्यात आलेल्या असून त्यांनी सदर बाबतीत शाळा निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे.

(४) शाळेची इमारत ज्या जमीनीवर आहे त्या जमिनीचे ९९ वर्षाचे lease संपलेले असून शासनाकडे नुतनीकरणासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) बृहनमुंबई महानगरपालिकेकडे अतिरिक्त शौचालय आणि मुताऱ्या बांधण्यास परवानगीसाठी नकाशे सादर केले आहेत. मात्र अद्याप त्यास मंजूरी मिळालेली नसल्याने नवीन बांधकाम करता आलेले नाही.

(६) विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून संस्थेने नियुक्त केलेल्या मुख्याध्यापकास मान्यता प्रदानित करण्यात आलेली नाही त्यामुळे शाळा, व्यवस्थापनास वेतन अदा करणे आणि इतर दैनदिंन कामकाजासाठी अडचणी निर्माण होत आहेत. सदर मंजूरी त्वरित दिली जाणे आवश्यक आहे.

(७) शाळा व्यवस्थापनाने कोणतेही बेकायदेशीर काम केलेले नाही त्यामुळे शाळेची मान्यता रद्द करण्याचे आदेश एकतर्फी आणि अन्यायकारक असल्याने रद्द करण्यात यावेत.

सदर बाबतीत दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर मा. अध्यक्ष यांनी सेंट मेरी हायस्कुल या संस्थेस दि. २६.६.२०११ रोजी भेट देऊन स्थळ पाहणी करण्याचा निर्णय घेऊन तद्नंतर आदेश पारित करण्यात येतील असा निर्णय घेण्यात आला.

दि. २९.६.२०११ रोजी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, आणि मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी शिक्षण निरिक्षक, दक्षिण विभाग, शिक्षणाधिकारी, बृहनमुंबई महानगरपालिका पोलीस निरिक्षक, माझगाव, यांच्या समवेत सेंट मेरी हायस्कुल, मुंबई येथे प्रत्यक्ष भेट दिली. सदर भेटी दरम्यान उपसंचालक, शालेय शिक्षण विभाग, मुंबई आणि सेंट मेरी हायस्कुलचे प्रतिनिधी देखील उपस्थित होते.

विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई आणि सेंट मेरी हायस्कुलचे, माझगाव च्या व्यवस्थापनाने सादर केलेली माहीती पाहता खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आल्या आहेत.

(१) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी सेंट मेरी हायस्कुलच्या व्यवस्थापनाने शाळा समिती स्थापन केली नसल्याचे नमूद केले आहे. प्रत्यक्षात काही पालकांनी हजर राहून आणि इतर पालकांची स्वाक्षरी असलेले पत्र सादर करून हे स्पष्ट केले आहे की, सदर शाळे मध्ये समीती स्थापन केली आहे. तसेच पालकां समवेत सभा घेण्यात येतात. त्यामुळे शिक्षण विभागाने अधिकृत कार्यकारिणी/ अनधिकृत कार्यकारिणी, अधिकृत पदाधिकारी असा गोंधळ घालणे चुकीचे आहे. किंबहुना सदर बाब शाळा व्यवस्थपनास अडचण निर्माण करण्यासाठी केल्याचे दिसून येते. शाळेमध्ये रितसर शाळा समिती पालक शिक्षक संघ स्थापन केले असल्याने माध्यमिक शाळा समिती मधील कोणत्याही तरतूदीचा भंग झालेला नाही असे आयोगाचे मत झाले आहे.

(२) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी दि. २४ मे, २०११ च्या पत्रामध्ये संस्थेचे आर्थिक स्थैर्य आणि शाळेची आर्थिक व्यवस्था या संदर्भात माध्यमिक शाळा संहिता मधील नियम ३.२ ३ ४ चा भंग झाल्याचे नमूद केले आहे.

शाळेच्या व्यवस्थापनाने विविध माध्यमातून रु. १,४५,७०,८८१/- जमा केले आहे. या संदर्भात शिक्षण निरीक्षक यांनी दि. ९ नोव्हेंबर २००९ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, युनिट ३ पोलीस आयुक्तालय, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. सदर चौकशीमध्ये पैशाचा अपहार झाल्याचे व दखलपात्र गुन्हा उघडकीस येत नाही म्हणून चौकशी बंद करण्यात आल्याचे पोलिस विभागाकडून कळविले आहे. संस्थेचे आर्थिक व्यवहार पारदर्शक व भक्कम असल्याचे सुनावणीमध्ये नमूद केले आहे. संस्थेच्या वतीने डॉ. फ्रेझर मस्कारेन्हा यांनी संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत भक्कम आणि विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यास संस्था समर्थ असल्याचे निदर्शनास आणले. माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ (३) (४) चा बारकाईने अभ्यास केल्यास सदर नियम या प्रकरणाला लागू होत नाही असे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ (३) (४) चा संस्थेकडून भंग झाला आहे हे नमूद करणे चुकीचे आहे आणि त्या अनुषंगाने केलेली कार्यवाही आपोआप बेकायदेशीर आणि अनियमित ठरते.

(३) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी शाळेमध्ये भौतिक सुविधा विशेषत: स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध केलेली नाही असे नमूद केले आहे. सन्मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी दि. २९ जुन, २०११ रोजी प्रत्यक्ष भेट दिली असता संस्थेमध्ये १२ मुताऱ्या व ९ शौचालय उपलब्ध असल्याचे दिसून आले. सुनावणी दरम्यान शिक्षण निरिक्षक यांनी असे मत नोंदविले की, १०० विद्यार्थ्यांसाठी एक मुतारी असणे आवश्यक आहे. शाळेमध्ये विद्यार्थी संख्या ९५९ आहे आणि एकूण स्वच्छतागृहाची संख्या २१ आहे त्यानुसार शाळेमध्ये स्वच्छतागृहाची संख्या आवश्यकतेपेक्षा जास्त आहे.

सन्मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी दि. २९ जुन, २०११ रोजी शाळेमध्ये short recess मध्ये भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता तसेच विद्यार्थ्यांशी त्या संदर्भात चर्चा केली असता स्वच्छतागृहामध्ये कसल्याही प्रकारची गर्दी होत नसल्याचे तसेच विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारची असुविधा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचा स्वच्छतागृहाबाबत उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत तकलादू असल्याचे दिसून येते आणि सदर बाब केवळ शाळा व्यवस्थापनाला त्रास देण्याच्या उद्देशाने उपस्थित केलेला आहे असेही दिसून येते. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची वागणूक अनाकलनीय आणि अल्पसंख्याक शिक्षण संस्थेस त्रास देण्याच्या हेतुने झाली असल्याचे

निषपन्न होते. सन्मा. अध्यक्षांच्या भेटीच्या वेळी प्रत्येक मजल्यावर ६ मुताऱ्या आणि ३ शौचालय तात्पुरत्या स्वरुपात कॅरिडोरच्या एका बाजुस उपलब्ध असलेल्या जागेमध्ये बांधण्याचे शाळा व्यवस्थापनाने मान्य केले आहे त्यामुळे सदर बाब योग्य समन्वय साधून सोडवता आली असती ही बाब प्रकर्षाने लक्षात घेणे आवश्यक आहे.

(४) शाळेमध्ये असलेल्या प्रयोगशाळेमध्ये तसेच ग्रंथाल्यामध्ये साहित्य/पुस्तके पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याचे विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी नमूद केले आहे की, प्रत्यक्षात किती प्रमाण (Quantity) किंवा संख्या असायला हवी होती आणि प्रत्यक्षात किती आढळून आली हे नमूद न करता सदर बाब मोघमपणे नमूद केली आहे. तसेच शाळेच्या ग्रंथालयात किती पुस्तके उपलब्ध आहेत हेही नमूद केलेले नाही. यावरुन शैक्षणिक सुविधाबाबत नोंदविलेले निरिक्षण तकलादू व वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे स्पष्ट होते. शाळा व्यवस्थापनास योग्य सूचना देऊन सदर शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी उपाययोजना करणे सहज शक्य होते. मात्र सदर बाबीचा शाळेची मान्यता काढून घेण्यासाठी उपयोग करण्यात आला ही बाब निश्चितच अयोग्य आणि जाणीवपूर्वक व्यवस्थापनास त्रास देण्याच्या हेतूने केली असल्याचे दिसून येते.

(५) शैक्षणिक नियोजन आणि कार्यवाही संदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी नमूद केलेले अभिप्राय देखील स्वीकार्ह नसल्याचे दिसून येते. सदर बाबतीतील निरिक्षण अत्यंत मोघम स्वरुपाचे आहे. शिक्षण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नियमितपणे शाळांना भेटी देऊन शैक्षणिक बाबी सुधारल्या जाऊ शकतात. शैक्षणिक नियोजन व कार्यवाही शाळेकडून झाली नसती तर शाळेचा निकाल चांगला लागला नसता. शाळेचे निकाल पाहता शैक्षणिक नियोजन योग्य असल्याचे मान्य करण्याशिवाय पर्याय रहात नाही. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन तपासणी आणि मार्गदर्शन करुन वेळीच पुर्तता करुन चुका टाळणे आवश्यक आहे.

(६) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी सदर शाळेमध्ये नेमावयाच्या मुख्याध्यापका संदर्भात देखील घोळ घातल्याचे दिसून येते. अल्पसंख्याक व्यवस्थापनाची शाळा आहे आणि दोन शाळा एकाच व्यवस्थापनामार्फत वेगळया नावाने चालविल्या जात आहेत. तसेच विभागाने सुचविल्याप्रमाणे पुर्वीच्या संस्थेतील पदाचा राजीनामा देखील दिलेला आहे. शिक्षण विभागाने योग्य प्रस्तावावर त्वरित निर्णय घेऊन शाळेस कळविणे आवश्यक होते. तथापि ७८ वर्षापासून चालू असलेल्या शाळेतील मुख्याध्यापकाच्या पदास मान्यता न देऊन शिक्षण विभागाने हेतुत: अनागोंदी निर्माण केली असल्याचे दिसून येते. सदर बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची आणि अल्पसंख्याक शाळा व्यवस्थापनामध्ये हेतुत: गोंधळ निर्माण करणारी असल्याचे दिसून येते.

(७) विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शाळेय अभिलेख्याबाबत मुद्दा उपस्थित केला आहे.सदर बाब शाळेच्या नियमित तपासणीशी निगडीत आहे. शिक्षकांना बऱ्याचशा प्रशासकीय बाबींची माहिती नसते तसेच अनुभव नसतो. त्यामुळे विविध नोंदवहया, जडसंग्रह नोंदवही, प्रयोगशाळा नोंदवही इ. बाबी अपुर्ण राहू शकतात. या नोंदवहया संस्थेस योग्य ते मार्गदर्शन करुन आणि पाठपुरावा करुन पूर्ण करुन घेता येऊ शकतात. केवळ या बाबींचा बाऊ करुन अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेची मान्यता काढून घेणे अत्यंत चुकीचे आणि भेदभावपुर्ण आहे.

(८) सेंट मेरी हायस्कुल, माझगाव, मुंबई च्या व्यवस्थापनासंदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी विविध संकीर्ण या मुद्याखाली विविध प्रकारचे उल्लंघन झाले आहे आणि माध्यमिक

शाळा संहिता नियम ३.२ (३)(४) मधील तरतुदीचा भंग केला असल्याचे नमूद केले आहे. वास्तविक सदर नियम या संदर्भात उपस्थित केलेल्या कोणत्याही बाबीला लागू होत नाही. सदर नियम शैक्षणिक संस्थाच्या आर्थिक परिस्थितीशी निगडीत आहे त्यामुळे चुकीच्या नियमांचा वापर करुन अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांची मान्यता काढून घेण्याची कार्यवाही विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी केली असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त विवेचन तसेच दोन्ही बाजुकडून सादर करण्यात आलेली कागदपत्रे आणि पुरावे पाहता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

(१) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी त्यांच्याकडील पत्र क्र. शिउस/मा-क४/माका/दक्षिण/२०१०-११/१५४५५-६०, दि. २४ मे, २०११ अन्वये माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ (३)(४) मधील तरतुदीचा भंग केल्यामुळे माध्यमिक शाळा संहिता ७.४ अन्वये सेंट मेरी हायस्कुल माझगाव, मुंबई या शाळेची मान्यता शैक्षणिक वर्ष २०१०-११ अखेर पुर्णत: काढून घेतल्याबाबतचे आदेश पुर्णपणे बेकायदेशीर आणि वस्तुस्थितीशी विपरित असल्याने सदर आदेश तात्काळ रद्द करण्यात यावेत.

(२) सेंट मेरी हायस्कुल, माझगाव, मुंबई या शाळेच्या मुख्याध्यापकाच्या नेमणूकीसंदर्भात शाळेने सादर केलेल्या प्रस्तावास त्वरित मान्यता प्रदानित करुन शाळेसाठी नियमित पुर्णवेळ मुख्याध्यापकाची नेमणूक करण्यात यावी.

(३) सेंट मेरी हायस्कुल, माझगाव, मुंबई यांनी प्रत्येक मजल्यावर तात्पुरत्या स्वरुपात स्वच्छतागृहे बांधून विद्यार्थ्यांची गैरसोय टाळावी.

(४) आर्थिक गुन्हे शाखा, युनिट ३ पोलीस आयुक्तालय, मुंबई यांनी सखोल चौकशी केल्यानुसार संस्थेमध्ये कोणतीही अनियमितता झालेली नसल्याने संस्थेविरुद्ध अनियमितता झाल्याचा बनाव करुन यापुढे कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये. संस्थेकडे जमा असलेला निधी विद्यार्थ्यांकरिता सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी खर्च करण्यात यावा. सदर बाबतीत शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संस्थेस मार्गदर्शन करावे तसेच त्यावर देखरेख ठेवावी.

(५) विभागीय शिक्षण उपसंचालकाच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या प्रशासकीय स्वरुपाच्या बाबीसंदर्भात शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संस्था व्यवस्थापनास मार्गदर्शन करुन पुर्तता करुन घ्यावी. संस्था व्यवस्थापनाने शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करावे.

(६) जवळपास १००० विद्यार्थ्याच्या भवितव्याचा विचार करुन शाळेची मान्यता काढून घेण्यासारखे आदेश पारित करतांना यापुढे शासन स्तरावरुनच कार्यवाही करण्यात यावी.

(७) खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

**कु. मनजीत कौर, केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ, प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका यांनी दि. ६ जुलै, २०११ रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ८ जुलै, २०११ रोजी आयोजित केलेली सुनावणी**

दि. ८ जुलै २०११ रोजी केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ येथील प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका (इंग्रजी) कुमारी मनजीत कौर यांच्या तक्रारीवर घेतलेली सुनावणी.

| | |
|---|---|
| कु. मनजीत कौर, प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका (इंग्रजी),<br>केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ<br><br>मुख्याध्यापक<br>केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ<br>सहाय्यक आयुक्त,<br>केंद्रिय विद्यालय संघटन,<br>पवई, मुंबई | अर्जदार |
| आयुक्त,<br>केंद्रिय विद्यालय संघटन,<br>नवी दिल्ली<br>सचिव,<br>मनुष्यबळ विकास, केंद्र सरकार,<br>नवी दिल्ली. | प्रतिवादी |

कु. मनजीत कौर, केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ, प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे त्यांचे राजीनामापत्र रद्द करण्याबाबत तक्रार केली आहे.

कु. मनजीत कौर या केंद्रिय विद्यालय संघटनेमार्फत प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका (इंग्रजी) या पदावर केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ येथे नियुक्त करण्यात आले. श्रीमती मनजीत कौर यांनी अशी तक्रार दिली आहे की, केंद्रिय विद्यालय अंबरनाथ चे मुख्याध्यापक श्री. चौबे यांनी त्यांना जबरदस्तीने प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका (इंग्रजी) या पदाचा राजीनामा द्यायला भाग पाडले. अर्जदाराने त्यांच्या अर्जाद्वारे खालील मुद्दे आयोगाच्या निदर्शनास आणले आहेत.

(१) अर्जदार या अविवाहित महिला असून त्या अल्पसंख्याक शीख समुदायाच्या आहेत.

(२) अर्जदार या इतर मागासवर्गीय (लोहार) समाजाच्या आहेत.

(३) अर्जदार या प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका (इंग्रजी) या पदावर केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ जिल्हा ठाणे येथे काम करीत होत्या.

(४) केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ हे श्री. पी.आर.एल.गुप्ता, सहाय्यक आयुक्त, केंद्रिय विद्यालय संघटन, पवई मुंबई यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करते.

(५) तक्रारदाराने केंद्रिय विद्यालय संघटन, येथील १५ वर्षे काम केलेले आहे.

(६) कंद्रिय विद्यालय, अंबरनाथ चे मुख्याध्यापक श्री. चौबे यांनी त्यांना जबरदस्तीने प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका (इंग्रजी) या पदाचा राजीनामा द्यायला भाग पाडले.

(७) अर्जदाराची आई ही रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आणि मणक्याच्या व्याधीनी आजारी आहे. ती ६७ वर्षाची असून सैनिक इस्पितळ, जालंधर, पंजाब येथे नियमित उपचार घेते.

(८) अर्जदाराचे वडील हे ७२ वर्षाचे असून ते माजी सैनिक आहेत आणि त्यांनी भारतीय सैन्य दलात २८ वर्षे सेवा केली आहे.

(९) अर्जदाराने तिच्या व्यतिरिक्त तिच्या आईवडीलांची काळजी घेण्यासाठी भारतात कोणीही नसल्याने अंथरुणावर खिळलेल्या आईच्या सेवेसाठी मुख्याध्यापक, केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ यांचेकडे दिर्घ रजेची मागणी केली होती. अर्जदाराने तिचे पालक जालंधर येथे राहत असल्याचे देखील निदर्शनास आणले होते.

(१०) अर्जदाराने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, तिची मानसिक स्थिती ठिक नसून ती मानसिकरित्या खचल्याने तिच्यावर औषधौपचार चालू असल्याबाबतचे कागदपत्रे केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ यांना सादर केली असून वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्तीची मागणी त्यांनी केली आहे.

(११) अर्जदाराचे तिची ६६ वर्षाची आई अंथरुणाला खिळली असल्याबाबतची बाब आयोगाच्या निदर्शनास आणली आहे. तिची आई एकटी असून ती दयनिय अवस्थेत असल्याने तिची काळजी घेण्यासाठी तिच्या गावी जायचे आहे. अर्जदाराना आईच्या सेवेसाठी जायची तीव्र गरज असल्याने तिने रजेची मागणी केली असून तीची मानसिक स्थिती खचलेली आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराने मुख्याध्यापक केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ यांना सातत्याने रजेची मागणी केली आहे. इतके असून देखील श्री. चौबे, मुख्याध्यापक यांनी तीला रजा मंजूर न करता आईची सेवा करावयाची असल्यास राजीनामा देणे हा एकच पर्याय असल्याने सांगीतले. अर्जदाराकडे अंथरुणाला खिळलेल्या आईची सेवा करण्यासाठी दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने तिने मानसिक तणावाखाली १५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर राजीनामा दिला आहे.

(१२) अर्जदाराने आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, ती एक चांगली शिक्षिका असून ती शिकवत असलेल्या विषयामध्ये १० वीच्या बोर्डाच्या परीक्षेत १०० टक्के निकाल दिलेला आहे. इतकेच नव्हे तर शाळेच्या मासिकाचे मुख्य संपादक, सह संपादक पदावर काम केलेले आहे. त्याचप्रमाणे समन्वय समिती, स्टाप क्लब कमिटी इत्यादीमध्ये काम कले असून त्याकरिता तिला प्रशंसापत्र देखील मिळालेले आहेत.

(१३) अर्जदाराने आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, वरिष्ठांनी चुकीचा सल्ला देऊन ती मानसिक तणावाखाली असतांना तिला राजीनामा द्यायला भाग पाडले आहे.

(१४) अर्जदाराने आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, ती अविवाहीत असल्याने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने जगण्यासाठी तिला फार मोठया संकटाचा सामना करावा लागत आहे.

(१५) कु. मनजीत कौर यांनी त्यांचा राजीनामा रद्द करुन त्यांच्या पुर्वीच्याच पदावर प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावर मुंबई विभागातील कोणत्याही केंद्रिय विद्यालयात पुनर्नियुक्ती करण्याची विनंती केली आहे.

अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जाचा विचार केला असता आणि त्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे पाहता कु. मनजीत कौर यांनी केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ येथे प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावर १५ वर्षे सेवा केलेली आहे. त्यांनी एम.ए.एम.एड केलेले असून त्यांनी पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन मध्ये पदविका धारण केलेली आहे. यावरुन अर्जदार ही उच्च विद्याविभुषित असल्याचे दिसून येते.

त्यांनी पालकाच्या वैद्यकीय उपचाराबाबतचे सादर केलेली कागदपत्रे पाहता, अर्जदाराची आई ही रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आणि मणक्याच्या व्याधीनी सन २००७ पासून प्रदिर्घ काळ आजारी आहे. तसेच तिच्या वडीलांचे डोळयाची शस्त्रक्रिया झाल्याचे दिसून येते. अर्जदारांनी सादर केलेल्या जातीच्या दाखल्यावरुन ती शीख (लोहार) या समाजाची असून ती इतर मागासवर्गीय या प्रवर्गात येते. अर्जदाराने असे सांगीतले की, तिच्या आजारी आईची सेवा करण्यासाठी जालंदर येथे कोणीही नसल्याने तिजा रजा घेणे गरजेचे आहे. तिचे आई वडील आजारी असल्याने ती मानसिक तणावाखाली असल्याचे निष्पण होते. अर्जदार ही मानोपचाराचे औषधोपचार घेत असून केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ यांना स्वत:च्या अंथरुणाला खिळलेल्या आईची सेवा करण्यासाठी दिर्घ रजा देण्याची विनंती केली होती. श्री. चौबे, मुख्याध्यापक यांनी तिला रजा मंजूर न करता राजीनामा सादर करुन स्वेच्छा सेवानिवृत्ती घेण्याचा सल्ला दिला.

हा अत्यंत विचित्र सल्ला असून अडचणीत असणाऱ्या कर्मचाऱ्यास मदत करण्याऐवजी तिच्या वरिष्ठांनी तिला राजीनामा देण्यास भाग पाडून तिचे भविष्य उद्वस्त केले आहे. अर्जदाराने भांबावलेल्या स्थितीत आईची सेवा करण्यासाठी घाईघाईने राजीनामा सादर करुन नोटीसचा कालावधी क्षमापीत करण्याची विनंती केली. श्री. पी.आर.एल.शर्मा, सहायक आयुक्त, केंद्रीय विदयालय, पवई, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक एफ २७०४४/१/२०१०/के ई व्ही एस (एम यु एस), दि.११.२.२०११ व्दारे केंद्रीय विदयालय, अंबरनाथ यांना कुमारी मनजीत कौर यांचा राजीनामा स्वीकारण्याचे सुचीत केले.

त्यानुसार तीला प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावरुन केंद्रीय विदयालय, अंबरनाथ येथून कार्यमुक्त केले.

अर्जदारांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी केली असता आणि मौखिक पुरावे पाहिले असता खालील मुद्दे तपासणे आवश्यक आहे.

१. मनजीत कौर यांचे पालक आजारी आहेत किंवा नाही, आणि तिची आई अंथरुणाला खिळलेली आहे किंवा नाही.

२. कुमारी मनजीत कौर ही मानसिक रित्या खचलेली आहे किंवा नाही.

३. कुमारी मनजीत कौर हीने स्वेच्छेने राजीनामा दिला आहे कि तिला जबरदस्तीने राजीनामा दयायला भाग पाडले आहे.

४. कुमारी मनजीत कौर हीने राजीनामा देवून / स्वेच्छानिवृत्ती घेवून चूक केली आहे का,

५. कुमारी मनजीत कौर हीच्यावर अन्याय झाला आहे काय,

६. कुमारी मनजीत कौर बरोबर भेदभाव झाला आहे काय,

७. कुमारी मनजीत कौर हीला पुन्हा सेवेत घेणे गरजेचे आहे काय,

वरील कागदपत्रांची आणि मौखिक पुरावे काळजीपूर्वक तपासले असता या प्रश्नांची उत्तरे त्रुटीची प्रमाणे आहेत.

१. कुमारी मनजीत कौर यांची आई सैनिक इस्पितळ, जालंधर येथे औषधोपचार घेत असून ती रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आणि मणक्याच्या व्याधीनी आजारी आहे आणि अंथरुणाला खिळलेली आहे आणि तीला वैद्यकीय उपचाराची गरज आहे. कुमारी मनजीत कौर हीचे वडील यांच्या डोळयावर देखील याच कालावधीत शस्त्रक्रिया झालेली आहे. दोघेही वयोवृद्ध असून त्यांना त्यांची मुलगी कुमारी मनजीत कौर हीच्याकडून काळजीची गरज आहे.

२. पालकांच्या आजारपणामुळे विशेषत: आईच्या आजारपणामुळे कुमारी मनजीत कौर हीचे मानसिक खच्चीकरण होऊन त्यावर तिने औषधोपचार केले असून केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ यांनी तिच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती केलेली आहे.

३. असे दिसून आले आहे की, श्री. चौबे, मुख्याध्यापक, केंद्रिय विद्यालय यांनी कुमारी मनजीत कौर हीच्या अंथरुणाला खिळलेल्या आईची सेवा करण्यासाठी रजा मंजूर न करता त्याउपर कुमारी मनजीत कौर यांस राजीनामा देऊन आईची सेवा करण्यास सांगीतले. यावरुन असे दिसून येते की, कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्याप्रती क्रुर वागणूक दिली आहे. श्री. चौबे यांनी कुमारी मनजीत कौर यांच्याबद्दल सहानुभूती बाळगून त्यांना मदत करण्याऐवजी तिला प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावरुन राजीनामा देण्याचा सल्ला देऊन तिचे भविष्य नष्ट केले आहे. कुमारी मनजीत कौर ही एकटी महिला असून तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच श्री. चौबे यांनी कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्याचा छळ करुन तिला मानसिक रित्या क्रुरपणे वागवून राजीनामा देण्यास भाग पाडले. ही उच्चतम पातळीवरील छळवणूक असून तिचे भविष्य अंधकारमय करण्याचा मुख्य हेतू होता की जो गंभीर गुन्हा आहे. याकरिता श्री. चौबे, मुख्याध्यापक, केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ यांच्यावर गंभीर गुन्हयाकरिता कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाला हे स्पष्ट झाले आहे की, कुमारी मनजीत कौर यांना त्यांच्या केंद्रिय विद्यालयातील सद्यस्थितीत प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावरुन राजीनामा देण्याचा कोणताही हेतू नव्हता. ज्या स्थितीमध्ये ती सापडली ती टाळणे तिच्या हातात नव्हते कारण तिच्या अंथरुणाला खिळलेल्या आईची सेवा करण्यासाठी तिला जालंधर येथे जाणे आवश्यक होते. या परिस्थितीचा फायदा घेऊन आणि कुमारी मनजीत कौर हीच्या मानसीक ताणाचा उपयोग करुन श्री. चौबे यांनी अत्यंत हुशारीने तिला राजीनामा देण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याबाबत सल्ला दिला. यावरुन असे दिसून येते की, अर्जदाराच्या बाबतीत मुख्याध्यापक, केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ यांनी अंत्यत क्रुरपणे आणि अत्यंत दृष्टपणे कार्यवाही केलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांना छळवणूकीची वागणूक देण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचा भंग केलेला असून कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यास अत्यंत हिनपणे छळ केलेला आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, फार मोठया प्रमाणावर कुमारी मनजीत कौर यांचेवर अन्याय झालेला आहे.

कु. मनजीत कौर या शीख लोहार समाजाच्या असून हया समाजाचा इतर मागासवर्गीय प्रवर्गात समावेश आहे. मागासवर्गीयांना या देशात काही हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. शासनाने

वेळोवेळी मागासवर्गीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्याचे सल्ले दिलेले आहेत. या सर्व मार्गदर्शक तत्वांना पायदळी तुडवून कुमारी मनजीत कौर यांना राजीनामा देण्यास भाग पाडून तिचे विरुद्ध भेदभाव केलेला आहे. यावरुन सिद्ध होते की, संशयापलिकडे जावून देखील तिच्या बद्दल भेदभाव झालेला आहे.

जरी कागदपत्रावरुन असे दिसत असले तरी कुमारी मनजीत कौर यांनी सेवेचा राजीनामा दिलेला आहे. तरी या प्रकरणात सखोल गेल्यावर आणि यातील खाचाखोचा पाहता असे निदर्शनास येते की, कुमारी मनजीत कौर हिला तिच्या आजारी आईच्या सेवेसाठी जावयाचे असल्याने तिने रजेसाठी विनंती केली असता तिला मुख्याध्यापकाने प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावरुन राजीनामा देण्यास भाग पाडले.

सर्वसाधारणपणे राजीनामा हा नियुक्ती प्राधिकरणाला सादर करण्यात येतो. काही परिस्थितीमध्ये राजीनामा परत घेणे याकरीता अपवाद असता काही वेळेस राजीनामा परत घेण्याकरिता मंजूरी देण्यात येते. सर्वसाधारणपणे पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर राजीनामा स्वीकृत करण्यात येतो. मनजीत कौर हीने दि. ६ डिसेंबर २०१० च्या पत्राद्वारे राजीनामा सादर केला आणि तो दि. १७ जानेवारी, २०११ रोजी स्वीकृत करण्यात आला. या असे दिसून येते की, हा राजीनामा स्वीकृत करतांना विशेषत: या प्रकरणात कोणताही विचार न करता तसेच कुमारी मनजीत कौर या बाबतच्या परिणामाबाबत सुचित न करता तसेच फेरविचार करण्यास न सांगता स्वीकृत करण्यात आलेला आहे. काही प्रकरणात ज्या कर्मचाऱ्यांचे विभागीय चौकशी चालू असते त्यांना काही प्रकरणात शिक्षा देण्यात येते मात्र त्यांना सेवेतून बडतर्फ/ काढून टाकण्यात येत नाही.

काही सेवांमध्ये काही सक्षम प्राधिकरण दक्षते संदर्भातील मंजूरी आणि विभागीय देणी दिल्याशिवाय राजीनामा स्वीकृत करत नाही. राजीनामा पत्र मागे घेण्याबाबत कायदेशीररित्या काही तरतुदी आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यामुळे त्या परिस्थितीत अर्जदारास जबरदस्तीने राजीनामा द्यावा लागला आहे त्यामुळे आयोगाच्या मते कुमारी मनजीत कौर यांना जबरदस्तीने राजीनामा द्यायला भाग पाडले ही कृती कामाच्या ठिकाणी महिलेचा छळ केल्याचे स्पष्ट करण्यात येते.

कुमारी मनजीत कौर यांनी दिलेला राजीनामा हा मागे घेण्यायोग्य असून तीला राजीनामा मागे घेण्यासाठी एक संधी देणे आवश्यक आहे आणि तिला प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावर केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ येथे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सेवेत कायम करावे या प्रकरणात कुमारी मनजीत कौर हिला राजीनामा मागे घेऊन सेवेत पुन:स्थापित करणे हाच खरा योग्य न्याय होईल.

कुमारी मनजीत कौर यांनी सादर केलेले कागदपत्रे आणि मौखिकरित्या सादर केलेले पुरावे आणि उपरोक्त नमूद प्रमाणे चर्चीले गेलेले मुद्दे विचारात घेता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग खालीलप्रमाणे निर्णय पारित करीत आहे.

**निर्णय**

(१) कुमारी मनजीत कौर, प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) केंद्रिय विद्यालयाने जबरदस्तीने प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावरुन राजीनामा देण्यास भाग पाडले आहे. त्यामुळे तीला राजीनामा मागे घेण्यास आणि पुनश्च प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (इंग्रजी) या पदावर केंद्रिय विद्यालय, अंबरनाथ येथे पुन:स्थापित करण्यात यावे.

(२) मनुष्यबळ विकास मंत्रालय, केंद्र सरकार आणि आयुक्त, केंद्रिय विद्यालय, संघटन, भारत सरकार, नवी दिल्ली आणि संबंधित अधिकारी यांनी कुमारी मनजीत कौर यांच्या प्रकरणाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन राजीनामा मागे घेण्यास आणि तिने राजीनामा दिला नाही असे गृहीत धरुन तिला सेवेत पुन:स्थापित करुन तिची सेवा नियमित करण्याबाबत सुयोग्य आदेश पारित करावेत.

(३) कुमारी मनजीत कौर हिच्या अनुपस्थितीचा कालावधी विनावेतन अथवा रजा शिल्लक नाही असे गृहीत धरुन नियमीत करण्यात यावे आणि तिची सेवा तिच्या सेवेच्या इतर करणांसाठी ग्राह्य धरण्यात यावी.

(४) मनुष्यबळ विकास मंत्रालय, केंद्र शासन आणि आयुक्त, केंद्रिय विद्यालय, केंद्र शासन यांनी या अनुषंगाने कुमारी मनजीत कौर यांच्या विनंतीच्या अनुषंगाने सुयोग्य आदेश ४५ दिवसात पारित करावेत.

(५) कार्यपुर्ती अहवाल महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास आदेश पारित केल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांत सादर करावेत.

**अलिगड मुस्लिम विद्यापीठाचे केंद्रास सुलीभंजन, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद येथील दि.२५ ऑक्टोंबर, २०११ रोजी केलेल्या जागेच्या पाहणी संदर्भातील अहवाल.**

मा. कुलगुरु, अलिगड मुस्लिम विद्यापीठ यांच्या समितीच्या औरंगाबाद आणि मालेगाव येथील भेटीसाठी सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी समितीच्या दौऱ्यामध्ये उपस्थित राहून आवश्यक ते सर्व सहकार्य केले आहे. सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

(१) प्रो. पी.के. अब्दुल अजीज, कुलगुरु, अलिगड मुस्लिम विद्यापीठ.

(२) प्रो. अन्वर जहॉ जुबेरी, डीन, फॅकल्टी ऑफ सोशल सायन्स आणि माजी कुलगुरु, अलिगड मुस्लिम विद्यापीठ.

(३) प्रो. जावेद अख्तर, डीन, फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

(४) प्रो. अक्रम हुसेन, प्राचार्य, झेड.एच. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग.

(५) प्रो.एन.ए.के.दुर्राणी, प्रसिध्द सल्लागार.

(६) प्रो. मोहम्मद सौद आलम कासमी, माजी डीन, फॅकल्टी ऑफ टेक्नॉलॉजी.

समितीच्या औरंगाबाद जिल्ह्यामधील भेटीच्या वेळी मा.ना.श्रीमती फौजीया खान, राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास, महाराष्ट्र राज्य तसेच मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग हे मान्यवर देखील उपस्थित होते.

मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांनी हॉटेल VITS औरंगाबाद येथे सकाळी ७.३० वा. मा. कुलगुरु, अलिगड मुस्लिम विद्यापीठ आणि सर्व समिती सदस्यांसोबत चर्चा केली. मा. राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास, महाराष्ट्र राज्य यांचे आगमन झाल्यानंतर सर्व मान्यवरांनी मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी निश्चित केलेल्या जमिनीची पाहणी करण्यासाठी प्रयाण केले.

औरंगाबाद पासून साधारणपणे ४ ते ५ कि.मी. अंतरावर असलेल्या मिटमिटा भागामध्ये डोंगर पायथ्याशी असलेल्या अंदाजे २५० एकर जमिनीची समितीने प्रथम पाहणी केली. सदर जमीन महानगरपालिका, औरंगाबाद च्या क्षेत्रामध्ये समाविष्ट आहे. तसेच या ठिकाणी विधिमंडळासाठी इमारत बांधण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगण्यात आले. सदर दौऱ्याच्या वेळी उपविभागीय अधिकारी, वैजापूर आणि संबंधित तहसीलदार, नायब तहसीलदार आणि इतर सरकारी अधिकारी उपस्थित होते.

खुलताबाद येथे आगमन झाल्यानंतर समिती सदस्यांनी पायी तसेच मा. राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास, महाराष्ट्र राज्य यांच्या खाजगी वाहनांमधून डोंगर माथ्यावरील कच्च्या रस्त्याने प्रवास करुन सुलीभंजन ता. खुलताबाद येथे प्रस्तावित केलेल्या जागेची पाहणी केली. तद्नंतर मा. राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास, महाराष्ट्र राज्य, मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा. कुलगुरु, अलिगड मुस्लिम विद्यापीठ तसेच समिती सदस्यांनी खुलताबाद येथील अल इरफान स्कुलच्या कार्यालयामध्ये सदर जागेचे नकाशे आणि इतर कागदपत्रांची पाहणी केली आणि संबंधित अधिकाऱ्यासोबत चर्चा केली. तसेच शाळेच्या टेरेसवरुन प्रस्तावित जागेचे विहंगम दृश्य पाहिले.

सुलीभंजन, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद येथे पोलीस विभागाकडून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तेथे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही किवा समिती सदस्यांच्या जागा पाहणीमध्ये कोणताही अडथळा आला नाही.

जागेची पाहणी पुर्ण झाल्यानंतर सन्मा. समिती सदस्यांनी स्थानिक नगराध्यक्षाच्या विनंतीवरुन खुलताबाद येथील दर्गाहला भेट दिली आणि तेथून चाळीसगाव मार्गे मालेगाव, जि. नाशिककडे प्रयाण केले.

मालेगाव येथे आगमन होताच मालेगावच्या हद्दीवर सन्मा. आमदार श्री. मुफती मोहम्मद ईस्माईल यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. तद्नंतर सर्व सन्मा. समिती सदस्यांचे शासकीय विश्रामगृह, मालेगाव येथे आगमन झाले. शासकीय विश्रामगृह, मालेगाव येथे जिल्हाधिकारी, नाशिक यांनी समितीचे स्वागत केले आणि समितीच्या सदस्यांसोबत चर्चा करुन साधारणपणे दु. ३.०० वा. सर्व समिती सदस्य, संबंधित जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांचे समवेत रामपुरा येथे जमीनीच्या पाहणीसाठी रवाना झाले. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सुचविलेली जागा नाशिक-धुळे या दोन जिल्ह्याच्या हद्दीवर असून गावांमधील डोंगराच्या पाठीमागे धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्याची हद्द आहे. साधारण ५० मिनीटाच्या प्रवासानंतर रामपूर या गावापासून २ कि.मी. अंतरावर वाहनांचा ताफा थांबला. सदर ठिकाणी साधारणपणे ५०० लोकांचा जमाव रस्त्याच्या कडेला बसलेला होता. तसेच ५-६ पोलीस शिपाई आणि एक जीप होती. जमावामधील संख्या पाहता बंदोबस्त अत्यंत कमी होता. जिल्हा प्रशासनाला सदर ठिकाणी निर्माण होऊ शकणाऱ्या कायदा व सुव्यवस्था परिस्थितीचा अंदाज आला नाही. तसेच स्थानिक पातळीवरुन अशा परिस्थिती संदर्भात कोणतीही माहिती जिल्हा प्रशासनाला देण्यात आली नसावी असे दिसून येते. सदर ठिकाणी वाहने थांबवून मा. जिल्हाधिकारी, नाशिक आणि मा.खा.श्री. समीर भुजबळ, यांनी स्थानिक लोकांच्या जमावामध्ये जावून चर्चा केली. सदर चर्चेचा तपशील कळू शकला नाही. मात्र काही वेळातच तेथून सर्व वाहने परत फिरविण्यात आली आणि समिती सदस्य मालेगाव येथे परत आले आणि मनसुरा मदरसा, मालेगाव येथे भेटीस गेले. थोड्या वेळानंतर मा.श्री. समीर भुजबळ, खासदार, मा.आ.श्री. दादा भुसे आणि जिल्हाधिकारी, नाशिक हे मनसुरा मदरसा, मालेगाव येथे आले. त्यांनी सन्मा. समिती सदस्यासोबत चर्चा करून आपला प्रकल्प काय आहे ? याबाबत माहिती द्यावी तद्नंतर आम्ही स्थानिक जनतेसोबत चर्चा करून काही मार्ग काढण्याचा प्रयत्न करु अशी भुमिका मांडली.

सदर चर्चेच्या वेळी मा. जिल्हाधिकारी, नाशिक आणि श्री. चौगुले, अपर जिल्हा पोलीस अधीक्षक, मालेगाव हे देखील उपस्थित होते. मा. कुलगुरु, अलिगड मुस्लिम विद्यापीठ, यांनी सन्मा. लोकप्रतिनिधींना असे स्पष्ट केले की, अलिगड मुस्लिम विद्यापीठ हे केंद्रिय विद्यापीठ आहे. विद्यापीठ धर्मनिरपेक्ष असून केंद्र शासनाने ठरवून दिलेले कायदे आणि नियमानुसार चालत आहे. विद्यापीठामध्ये भारत देशातील सर्व प्रांतातील तसेच विदेशातील विद्यार्थी देखील शिक्षण घेतात. तसेच विद्यापीठामध्ये पांरपारिक आणि आधुनिक शिक्षणाच्या सर्व प्रकारच्या विद्याशाखा कार्यरत असल्याचे सांगीतले. मा. कुलगुरु यांनी असेही सांगीतले की, कोणत्याही भागामध्ये विद्यापीठाचे केंद्र स्थापन झाल्यानंतर स्थानिक जनतेसाठी शैक्षणिक आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. विद्यापीठ सर्व समाजामधील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे. त्यामुळे अशा शैक्षणिक उपक्रमास विरोध करणे अनाकलनीय आहे. मा. श्री. समीर भुजबळ, खासदार, आणि मा.श्री. दादा भुसे, आमदार यांनी समिती सदस्यांसमोर असे मत मांडले की, अलीगड मुस्लिम विद्यापीठाबाबतची माहिती लोकप्रतिनिधींना देखील नव्हती त्यामुळे समितीने दिलेली माहिती घेऊन आम्ही स्थानिक लोकांशी चर्चा करु.

बैठकीनंतर समिती सदस्यांनी भोजन करून औरंगाबादकडे प्रयाण केले. वाटेमध्ये मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी मनमाड पासून साधारणपणे २० किमी अंतरावर चोंढी या गावी आणखी शासकीय जमीन दाखविली सदर जमीन साधारणपणे ७५० एकर असून मालेगाव - मनमाड रस्त्याने विभागलेली आहे आणि त्यापैकी अंदाजे २५० एकर जमीन वन खात्यास हस्तांतरीत करण्यात आली आहे असे सांगण्यात आले. सदर जमिनीची पाहणी केल्यानंतर अलीगड मुस्लिम विद्यापीठाच्या सदर समितीने औरंगाबादकडे प्रयाण केले आणि औरंगाबाद येथे मुक्काम करून दि. २७ ऑक्टोंबर, २०११ रोजी औरंगाबाद येथून प्रयाण केले.

**अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग आणि अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१७ नोव्हेंबर, २०११ रोजी आयोजित केलेल्या मदरसा शिक्षण व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासंदर्भात कार्यशाळा चा कार्यवृत्तांत.**

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग आणि अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१७ नोव्हेंबर, २०११ रोजी सकाळी ११.०० वा. मदरसा शिक्षण व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासंदर्भात कार्यशाळा सह्याद्री राज्य अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेचा मुख्य उद्देश सदर योजना महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यान्वित न होण्याची कारणे शोधणे आणि शिक्षणाचा अधिकार अधिनियम मधील तरतुदींच्या अनुषंगाने मदरसांना कशा प्रकारे शैक्षणिक कार्यासाठी मदत करता येईल याबाबत चर्चा करण्यासाठी आणि या संदर्भातील पुढच्या वाटचालीसाठी दिशा ठरविणे हा होता.

सदर कार्यशाळेसाठी मदरसांचे प्रतिनिधी आणि शासनाचे अधिकारी मिळून साधारणपणे २५ प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनाच्या वेळी मा. श्रीम. टि.एफ. थेकेक्करा, अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी आपल्या स्वागतपर भाषणामध्ये कार्यशाळेचा उद्देश विषद करतांना असे नमूद केले की, मदरसांमधील विद्यार्थ्यांना आधूनिक शिक्षण मिळावे आणि मदरसांमधील धार्मिक शिक्षण पुर्ण झाल्यानंतर त्यांना शिक्षणांच्या प्रवाहामध्ये समाविष्ट होता यावे यासाठी काय करता येईल ? यासाठी विचारविनिमय करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनांची माहिती अल्पसंख्याक जनतेपर्यंत आणि मदरसांपर्यंत कशा पध्दतीने पोचविता येईल याची देखील चर्चा केली जाणे आवश्यक आहे. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी असे नमूद केले की, भारत सरकारच्या Special Programme for Quality Education in Madrasas या योजनेंतर्गत आवर्ती खर्चास मान्यता दिली जात नाही आणि मुख्यत्वे पायाभुत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी मदत दिली जाते आणि शासनाची अशी अपेक्षा आहे की, मदरसांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षणाबरोबर आधूनिक शिक्षणाची जोड द्यावी जेणे करून या विद्यार्थ्यांना भविष्यात शिक्षण चालू ठेवण्यासाठी तसेच नोकऱ्या मिळविण्यासाठी किंवा रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी फायदा होईल. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी असेही सुचित केले की, महाराष्ट्र शासनाकडून नोंदणीकृत मदरसांना पायाभुत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी रु.२,००,०००/- पर्यंतचे अनुदान देण्याची योजना शासनाच्या विचाराधिन आहे. यामध्ये शिक्षणाचा अधिकार अधिनियम अन्वये मदरसांना ज्या पायाभुत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे त्यासाठी मदत करण्याचा शासनाचा हेतु आहे आणि संबंधित मदरसांना जेवढी शासन मदत देत आहे तेवढ्या पुरतेच हिशोब देण्याचे दायित्व राहिल. चर्चेमध्ये भाग घेतांना श्रीमती व्ही. राधा, प्रकल्प संचालक महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद यांनी असे नमूद केले की, सदर योजना अतिशय महत्वाची आहे, सदर योजनांची सविस्तर माहिती सर्वांना आहेच योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी आपण किती चांगल्या पध्दतीने करु शकतो हे महत्वाचे आहे. श्रीमती व्ही. राधा यांनी असेही नमूद केले की, उत्तरप्रदेश, बिहार सारख्या राज्यांमध्ये या योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणावर घेण्यात येत आहे आणि महाराष्ट्र राज्यामध्ये सदर योजनेची अंमलबजावणी जवळपास नगण्य आहे. यामध्ये सुधारणा आणता येईल याचा विचारविनिमय करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

श्रीमती फरिदा लांबे, यांनी चर्चेमध्ये भाग घेतांना असे नमूद केले की, SPQEM या योजनेंसंदर्भात काही उपस्थितांच्या मनामध्ये शंका असू शकते तसेच शिक्षणाचा अधिकार अधिनियम अन्वये मदरसामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांना शाळा बाहय गणले जाणे आणि त्यांच्यासाठी यथोचित शैक्षणिक सुविधा निर्माण केली जाणे आवश्यक आहे.

श्री. नुरुद्दीन मुल्ला, उप संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय यांनी योजनेची सविस्तर माहिती सर्व प्रतिनिधींना दिली आणि असे निदर्शनास आणले की, मागील वर्षामध्ये भारत सरकारकडे उत्तर प्रदेश राज्यामधून १२०० प्रस्ताव सादर झाले होते आणि महाराष्ट्र राज्यामधून फक्त ११ प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले होते. तसेच चालू वर्षामध्ये ३५ प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. श्री. मुल्ला यांनी असेही नमूद केले की, मदरसांमध्ये शिकणाऱ्या मुलांना शिक्षण चालू ठेवण्यासाठी किंवा बँक अथवा इतर वित्तीय संस्थांकडून वित्तीय मदत घेण्यासाठी शैक्षणिक प्रमाणपत्रे नसल्याने मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे मदरसांमधील विद्यार्थ्यांनी मदरसांच्या शिक्षणाबरोबर आधूनिक शिक्षण घेणे आवश्यक आहे.

मदरसांच्या प्रतिनिधींनी असे नमूद केले की, राज्य शासनाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम मदरसांमधून शिकविला जातो मात्र सदर विद्यार्थ्यांची परिक्षा घेतली जात नाही आणि त्यांना प्रमाणपत्रे दिली जात नाहीत. तसेच त्यांच्या शिक्षणाचे Equivalence ठरविले जात नाही त्यामुळे मोठी अडचण येते.

मदरसासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्याकडे चौकशी केल्यास माहिती दिली जात नाही आणि दिशाभुल केली जाते. या संदर्भात अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी असे सूचित केले की, सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना सूचना निर्गमित करणे योग्य होईल. श्रीमती फरिदा लांबे यांनी असे सुचित केले की, जिल्हा स्तरावर किंवा विभागीय स्तरावर कार्यशाळा आयोजित करुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत आणि भारत सरकारकडे पाठविण्यात यावेत.

संगमनेर येथील प्रतिनिधींनी खालील बाबी निदर्शनास आणल्या.

(१) पूर्वी दाखल करण्यात आलेल्या अर्जाबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे याची माहिती अप्राप्त आहे.

(२) शासनाने अनुदान नियमितपणे देणे आवश्यक आहे अन्यथा मदरसांची अडचण होऊ शकते.

(३) मदरसांचे Recognition त्वरित केले जाणे आवश्यक आहे आणि अभ्यासक्रमाचे देखील प्रमाणीकरण (Standardisation) केले जाणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम शिकविला जात आहे. मात्र या मदरसांना मान्यता कोण देणार याबाबत कोणीच मार्गदर्शन करत नाही. तसेच मदरसांमधील शिक्षकांना प्रशिक्षण देऊन D.Ed. B.Ed. करण्यासाठी मार्गदर्शन केले जात नाही सदर प्रतिनिधींनी असे सांगीतले की, मदरसांमधील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सोलापूर येथील प्रतिनिधीनी असे सांगीतले की, मदरसांमध्ये पायाभुत सोयी निर्माण करण्यासाठी अनुदान दिले जाणे आवश्यक आहे. तसेच प्री मॅट्रीक स्कॉलरशिपची रक्कम त्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या तुलनेने खूप कमी आसल्याने सदर रक्कम वाढविली जाणे आवश्यक आहे.

कोंडिवरे येथील प्रतिनिधींनी असे सांगीतले की, त्यांच्या मदरसांमध्ये ७०० मुली व ४०० मुले शिक्षण घेत असून इंग्रजी माध्यमाची शाळाही चालविली जात असून विद्यार्थ्यांना मौलाना आझाद ऊर्दू विद्यापीठ, हैद्राबाद यांच्याकडून पदवी घेण्यासाठीची सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

हिंगोली येथील मदरसांच्या प्रतिनिधींनी असे निदर्शनास आणले की, ६० मुलींना मदरसाचे शिक्षण तसेच आधुनिक शिक्षण देण्यात येत आहे आणि त्यांना मराठी शाळेशी जोडण्यात आले आहे. मात्र त्यामध्ये बऱ्याच अडचणी येत आहेत. सदर मुलींच्या शिक्षणाचे Certification कोण करेल हा महत्वाचा प्रश्न आहे ही समस्या सोडविली जाणे आवश्यक आहे.

लातूर येथील प्रतिनिधींनी असा मुद्दा उपस्थित केला की, महाराष्ट्र राज्यामध्ये किती मदरसा आणि किती मकतब आहेत याबाबतची माहिती शासनाकडे नाही तसेच मदरसांचे सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. त्यामुळे याबाबतीतील नियोजन करणे अशक्य आहे. मदरसांच्या मदतीने सर्वेक्षण केल्यास अचुक माहिती उपलब्ध होऊ शकेल. सदर प्रतिनिधींनी अशी शंका उपस्थित केली की, मदरसा प्रामुख्याने लोकांनी दिलेल्या देणग्यामधून उपलब्ध झालेल्या निधीमधून चालविले जातात. शासनाने अनुदान दिल्यानंतर मिळालेल्या देणग्याचा खर्च शासन मागू लागेल आणि मदरसांच्या स्वायत्तेमध्ये ढवळाढवळ होईल. यामुळे शासनाने दिलेल्या निधीपुरतेच लेख्यांची / हिशोबाची मागणी करावी. किंबहुना शासनाची मदत घेतल्याने लोकांच्या देणग्या बंद होऊन मदरसा बंद पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मदरसा व्यवस्थापन शासकीय योजनांकडे पाठ फिरवितात. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, मदरसा व्यवस्थापन D.Ed. B.Ed. झालेल्या उमेदवारांना शासनाप्रमाणे जास्त वेतन देऊ शकत नाही.

कन्नड येथील प्रतिनिधीनी असे निदर्शनास आणले की, मदरसांमध्ये पायाभुत सोयीसुविधा निर्माण केल्या जाणे आवश्यक आहे आणि येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी यंत्रणा असावी. यावर अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी असे सुचित केले की, यासाठी एक खिडकी योजना तसेच अर्जाची online पध्दतीने नोंद केली जाऊ शकते. माहितीचे आदानप्रदान करण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष स्थापन केला जाणे आवश्यक आहे.

मदरसांच्या प्रतिनिधी सोबत सविस्तर चर्चे दरम्यान खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

(१) मदरसांना शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता देणे आणि अशी मान्यता कोणामार्फत देण्यात येईल.

(२) मदरसांमध्ये सध्या शिकविल्या जात असलेल्या आधुनिक विषया संदर्भात परिक्षा घेणे आणि प्रमाणिकरण (Certification) करण्याचा अभाव.

(३) मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करणे.

(४) मदरसांमधील शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता.

(५) शिक्षणाचा अधिकार अधिनियम आणि त्यांचे मदरसांवर होणारे परिणाम या संदर्भात मदरसांना मार्गदर्शन करण्यासाठी शासन स्तरावरुन कार्यवाहीची आवश्यकता.

(६) प्री मॅट्रीक स्कॉलरशिप योजनेमध्ये राज्य शासनाकडून आणखी मदत देण्याची आणि शिष्यवृत्तीची संख्या व रक्कम वाढविण्याची आवश्यकता.

(७) मदरसांना शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता देण्याचे निकष अधिक शिथिल आणि सोपे करण्याची आवश्यकता.

(८) मदरसांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास शिक्षकांची आवश्यकता किती असावी या संदर्भातील निकष ठरविले जाण्याची आवश्यकता.

(९) राज्यामधील मदरसा आणि मकतब यांचे सर्वेक्षण करण्याची आवश्यकता.

(१०) ऊर्दू शाळा म्हणून मान्यता देण्याची पध्दत सुकर (Facilitation) करण्याची आवश्यकता.

(११) मदरसांना योग्य पध्दतीने मार्गदर्शन करण्यासाठी एक खिडकी योजने ची आवश्यकता.

(१२) मदरसांमधील विद्यार्थ्यांना सुट्टयांमध्ये मूळ गावी जाण्यासाठी रेल्वे आणि बसचे आरक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.

कार्यशाळेमध्ये कार्यवाहीसाठी उपरोक्त प्रमाणे मुद्दे उपस्थित करण्यात आले. चर्चेअंती मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी असे स्पष्ट केले की, मदरसांना मदत करण्यासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित करण्यात येईल तसेच डिसेंबर अखेर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करुन सदर कार्यशाळेमध्ये यापूर्वी सादर करण्यात आलेल्या अर्जाबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन परिपुर्ण प्रस्ताव तयार करुन घेण्यात येतील आणि भारत सरकारकडे पाठविण्यात येतील.

अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सर्व मदरसांच्या प्रतिनिधींना विनंती केली की, या योजनेची माहिती सर्व मदरसांना देऊन योजनेचा प्रसार करावा आणि योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन करावे. या योजनेबाबत सर्व मदरसांना अल्पसंख्याक विकास विभागाकडून आवश्यक असलेली सर्व मदत करण्यात येईल. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सर्व मदरसांच्या प्रतिनिधींचे उपस्थित राहिल्याबाबत तसेच सकारात्मक चर्चा केल्याबद्दल आभार मानले.

श्री. एस.ई.ए.हाश्मी, सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी मदरसांच्या प्रतिनिधींना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे विविध परिक्षा घेऊन प्रमाणपत्रे (Certification) देत असल्याबाबत माहिती दिली आणि असेही सांगीतले की, भविष्यात सर्व मदरसांना या संदर्भात मार्गदर्शन केले जाईल. तसेच यापूर्वी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत सर्व मदरसांसाठी कार्यशाळेचे आयोजन करुन एकाच दिवसांमध्ये सविस्तर / सुधारित प्रस्ताव तयार करुन घेऊन राज्य शासनाची मान्यता घेऊन भारत सरकारकडे सादर करण्यात येतील. तसेच मदरसांना कोणत्याही बाबतीत मार्गदर्शन हवे असल्यास महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग आणि अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, यांचे संपर्क क्रमांक आणि दोन्ही कार्यालयाचे दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आले. श्री. एस.ई.ए.हाश्मी, सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी असे सूचित केले की, मरकज अल-मुआरिफ मार्फत मदरसांसाठी जे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात त्या संदर्भात सदर संस्थेसोबत सविस्तर चर्चा करुन मदरसांमधील शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करण्यात येईल. श्री. एस.ई.ए.हाश्मी, सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी मदरसांच्या प्रतिनिधीनी सदर कार्यशाळेसाठी उपस्थित राहून ज्या मौलीक सूचना केल्या त्याबाबत अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सर्व उपस्थितांचे आभार मानले.

अखेरीस श्रीमती शाहीन काद्री, सहसचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि असे आश्वासित केले की, मदरसांना मदत करण्यासाठी गांर्भीयाने कार्यवाही करण्यात येईल आणि मदरसांसोबत झालेली फलदायी चर्चा यापुढे देखील चालू राहिल अशी अपेक्षा व्यक्त केली.

MAHARASHTRA STATE
MINORITIES COMMISSION
Date: 20/06/11.
Inward No.: 2055.

**महाराष्ट्र शासन**

Asst.
→ S.O. file.
→ त्वरित उचित कार्यवाही.
20/6/2011.

क्रमांक : अविवि-२०११/प्र.क्र.४०/का-७
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १६/०६/२०११

**विषय :- महाराष्ट्रातील उर्दू माध्यमांच्या शाळांमधील पायाभूत व शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धतेबाबतच्या स्थितीसंदर्भात सर्वेक्षण प्रकल्पास मान्यता देण्याबाबत.**

**संदर्भ :-** महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे क्र. राअआ/सं.प्र.प्र./७७९/२०११, दि. ३१/३/२०११ चे पत्र.

**ज्ञापन :-**

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी १०.६०% लोकसंख्या मुस्लिम समाजाची आहे. मुस्लिमांची मातृभाषा उर्दू असल्याने बहुसंख्य मुस्लिम पालक त्यांच्या पाल्यांकरिता शिक्षणासाठी उर्दू माध्यमास पसंती देतात. महाराष्ट्रात सद्यस्थितीत ३०५०-४००० अनुदानित/विनाअनुदानित उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळा आहेत. तर सुमारे ९००-९५० माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमधून सुमारे ७ ते ८ लाख मुस्लिम विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अभ्यास विषयाच्या आकलनाची व पर्यायाने विश्लेषणाची क्षमता स्वाभाविकपणे सर्वाधिक असते. सहाजिकच ही मुले त्यांना शिकवण्यात येणारा अभ्यासक्रम/विषय झटकन आत्मसात करतात. याशिवाय भाषा हे सांस्कृतिक परंपरा आणि प्रसाराचे व देवाणघेवाणीचे प्रभावशाली माध्यम आहे.

न्या.सच्चर समितीने त्यांच्या अहवालात मुस्लिम समाजाचे इतर सामाजिक/धार्मिक समुहाच्या तुलनेत असलेले आर्थिक मागासलेपण अधोरेखित केले आहे. तसेच खाजगी व सरकारी सेवांमध्ये मुस्लिमांच्या अपुऱ्या/त्रोटक प्रतिनिधित्वाकडेही लक्ष वेधले आहे. मुस्लिमांच्या शैक्षणिक व पर्यायाने आर्थिक मागासलेपणाच्या अनेक कारणांपैकी प्रामुख्याने मुस्लिम बहुल भागात असलेल्या उर्दू शाळांमध्ये पायाभूत सुविधा व शैक्षणिक सुविधांचा असलेला दर्जा हे प्रमुख कारण मानले जाते. सद्यस्थितीत राज्यातील उर्दू माध्यमांच्या शाळामध्ये पायाभूत व शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धता /अनुपलब्धतेबाबतच्या स्थितीबाबत अधिकृत माहिती/आधारसामग्री उपलब्ध नाही.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या संदर्भाधीन पत्रान्वये टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई या संस्थेकडून महाराष्ट्रातील उर्दू माध्यमांच्या शाळामधील पायाभूत व शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धतेबाबत मुल्यांकन करुन या शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याच्या शक्यतेबाबत चाचपणी करण्याकरिता या शाळांचे सखोल सर्वेक्षण हाती घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

सदर संस्थेकडून महाराष्ट्रातील उर्दू माध्यमाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील पायाभूत व शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धतेबाबतची

सद्यस्थिती, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, या शाळांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा, विनाअनुदानित उर्दू माध्यमांच्या शाळांमधून शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम, विनाअनुदानित उर्दू प्राथमिक शाळांचा आर्थिक स्त्रोत, उर्दू माध्यमातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना इतर माध्यमातून शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी इत्यादीबाबत शास्त्रीय सर्वेक्षण व अभ्यास केला जाईल. या शाळांच्या शैक्षणिक विकासासाठी निश्चित स्वरुपाचे धोरण ठरविण्यासाठी शासनास सुयोग्य शिफारशी करण्याकरिता सदर सर्वेक्षण प्रकल्प हाती घेण्यास या ज्ञापनाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

राज्यातील उर्दू माध्यमांच्या शाळांमधील पायाभूत व शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धतेबाबतच्या स्थितीसंदर्भात हाती घ्यावयाच्या या सर्वेक्षण प्रकल्पाकरिता येणाऱ्या एकूण रु.१८,०५,९७०/- (रु. अठरा लाख पाच हजार नऊशे सत्तर फक्त) एवढया खर्चास याद्वारे वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सुरुवातीस या सर्वेक्षण प्रकल्पाकरिता एकूण रकमेच्या ६०% एवढी रक्कम म्हणजेच रु. १०,८३,५८२/- एवढी रक्कम संबंधित संस्थेस वितरीत करण्याबाबत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास सूचित करण्यात येत आहे.

सदर खर्चास वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग पहिला, उपविभाग तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद क्र. २७ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकांराचा वापर करुन मान्यता देण्यात येत आहे.


सदर खर्च मागणी क्रमांक झेडई -१ ए, "२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१२) अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी देण्याकरिता अनुदान (२२३५ ए - १८७) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू आर्थिक वर्षात या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(व्यंकटेश भट)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई.
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
डॉ. अब्दुल शाबान, सहयोगी प्राध्यापक, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई
निवड नस्ती.



अल्पसंख्यांक समाजाचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढविण्याकरिता स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण योजना. विद्यावेतनात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: अविवि-२०११/५१७/प्र.क्र.९५/११/का-९,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २० डिसेंबर, २०११.

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्रमांक: अविवि-२००९/प्र.क्र.२३४/०९/का-९,
दिनांक - २० मार्च, २०१०.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: राप्रव्यशि-२००९/
प्र.क्र.७३ (२)/ मशि-२, दि.३१ मे, २०११.

शासन निर्णय :-

अल्पसंख्याक समाजाचे (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शीख व पारशी ) शासकीय सेवांमधील प्रमाण वाढावे याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी अल्पसंख्याक समाजातील निवडक होतकरु १० उमेदवारांनी राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या मुंबई / कोल्हापूर / नागपूर / औरंगाबाद येथील प्रशासकीय प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रशिक्षण देण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. या शासन निर्णयान्वये उपरोक्त प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना दरमहा रु.१०००/- इतके मासिक विद्यावेतन देण्यात येत होते.

२ उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूर, औरंगाबाद व कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात करण्यात आलेल्या वाढीच्या धर्तीवर, या प्रशासकीय प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समुदायातील प्रत्येकी १० उमेदवारांना मिळणारे विद्यावेतन सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून रुपये २०००/- (रुपये दोन हजार फक्त) इतके करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

३ सदर खर्च 'मागणी क्र.झेडई-१ २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम (०१) (१७) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २५८, ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशीर्षाखाली सन २०११-१२ या वित्तीय वर्षाकरिता उपलब्ध अनुदानातून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४ सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या आणि वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७८६/११/व्यय-४, दि. ०३.११.२०११ नुसार मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

[illegible] हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०११२२००६२०१५२२१५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सं. का. गंद्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास, यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास, यांचे खाजगी सचिव,
मा. विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य (संसदीय कार्य विभाग,मंत्रालय यांचे मार्फत),
अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांचे स्वीय सहायक,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन (नागपूर/मुंबई) ५ प्रती
सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
संचालक, राज्य प्रशासकीय सेवा प्रशिक्षण संस्था, हजारीमल सोमाणी मार्ग, सी.एस.टी. स्थानकाजवळ, मुंबई ४०० ००१.
संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर/कोल्हापूर / औरंगाबाद,
सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,
उपसचिव / सह सचिव, वित्त विभाग/व्यय-४, अर्थोपाय, मंत्रालय,
उप सचिव, नियोजन विभाग/ का- १४११, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, (मशि-२) मंत्रालय, मुंबई,
सर्व अवर सचिव/सर्व कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,
मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, औरंगाबाद,
व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई,
कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, उर्दू साहित्य अकादमी, डी.डी.बिल्डींग, २ रा मजला, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई,
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र- १ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई,
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र- १ (लेखा परीक्षा) मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता)नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखा परिक्षा), नागपूर,
संचालक, लेखा व कोषागरे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
निवड नस्ती (कार्या-९).

-xxxxxxxxxxxx-

अल्पसंख्यांक समाजाचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढविण्याकरिता स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना सन २०११-१२ साठी यशदा, पुणे यांना निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:अविवि-२०११/प्र.क्र.६८/११/का.९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० डिसेंबर, २०११.

संदर्भ :- (१) शासन पत्र अल्पसंख्यांक विकास विभाग क्र.अविवि/प्र.क्र. ४०/१०/का-९, दि.२७.९.२०१०.
(२) यशदा, पुणे डॉ.आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांचे पत्र क्र.एसीईसी/ ९९१०/३/प्रवेश परीक्षा-२०१२/६३, दि. ८.६.२०११.

**शासन निर्णय :-**

अल्पसंख्याक समाजाचे (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, जैन व पारशी) अखिल भारतीय सेवेतील प्रमाण वाढावे याकरिता केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी अल्पसंख्यांक समाजातील निवडक होतकरु १० उमेदवारांना यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये शासनाने मान्यता दिली आहे. तसेच या प्रयोजनार्थ २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी रु.६.०० लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली होती.

२. यशदा, पुणे डॉ.आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये, वाढती महागाई, प्रशिक्षणार्थींना दिले जाणाऱ्या विद्यावेतनात वाढ, ग्रंथालय, अभ्यासिका, निवास व्यवस्था, फर्निचर, संगणक इ. सुविधांच्या अनुषंगाने अल्पसंख्याक विकास विभागाकडूनही सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर अल्पसंख्याक लोकसमूहातील १० उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या रु.६ लक्ष निधीमध्ये रु.१० लक्ष एवढी वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अल्पसंख्याक उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीच्या खर्चामध्ये सन २०११-१२ पासून रु.१० लक्ष इतकी वाढ करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदरहू रु.१० लक्ष निधी पैकी तूर्त रु.७.०० लक्ष एवढा निधी याद्वारे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनेकरिता रु.७ लाख (रुपये सात लक्ष फक्त) इतका निधी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांना उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे सुपूर्द करण्यात येत आहे. सदर रक्कम सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांच्या स्वाधीन करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पहातील. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांनी रु.७ लक्ष (अक्षरी रुपये सात लाख फक्त) इतक्या रकमेच्या

मर्यादित अर्थसंकल्प वितरण प्रणालीमधून आहरण व संवितरण करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने यशदा, पुणे यांचेकडून प्राप्त करून शासनास सादर करावे.

४. सदर खर्च 'मागणी क्र.झेडई-१ २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम (०१) (१७) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २५८, ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशीर्षाखाली सन २०११-१२ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८८४/११/व्यय-४ दि.०५/१२/२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१११२३००७४६३२१२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सुहास जाधवर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे,
सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई,
मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अविवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सह सचिव / उप सचिव / सर्व अवर सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय, मुंबई,
वित्त विभाग (व्यय-४ व अर्थ-१४) नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती (कार्यासन-९)

महाराष्ट्र शासन

क्रमांक : अविवि-२०१०/प्र.क्र.६/का-७
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३/०२/२०१२

MAHARASHTRA STATE MINORITIES COMMISSION
Date: 23/2/12
Inward No 853

विषय :- सोलापूर, भिवंडी आणि मालेगांव या शहरांमध्ये **Textile and Apparel Manufactring Clusters Development** च्या सर्वेक्षण प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

प्रस्तावना :-

सोलापूर, भिवंडी, जि.ठाणे, मालेगांव, जि. नाशिक या शहरातील अल्पसंख्याक समाज विशेष करुन मुस्लिम समाज रोजगारासाठी प्रामुख्याने यंत्रमाग आणि वस्त्रोद्योग या उद्योगांवरच मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. स्पर्धेमुळे येथील पारंपारिक उद्योग डबघाईला आला असून अशा परिस्थितीत रोजगाराचे स्थलांतर होवू नये, येथील लोकांची उत्पादकता व आर्थिकस्तर वाढावा यासाठी या भागातील यंत्रमाग, वस्त्रोद्योग आणि तयार कापड उद्योगाला चालना देण्यासाठी या शहरांमध्ये Textile and Apparel Manufactring Clusters Development या विषयावर नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ मायक्रो, स्मॉल अँड मिडियम इंटरप्रायझेस निजामी, दुरुफकुडा, हैद्राबाद या संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याबाबतच्या रु. ७,५०,०००/- (रु. सात लाख पंन्नास हजार फक्त)इतक्या रकमेच्या प्रस्तावास (रु. २.५० लक्ष प्रति शहर) वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर सर्वेक्षणाकरिता पहिल्या टप्यात एकूण रकमेच्या ५०% एवढी रक्कम म्हणजेच रु.०३,७५,०००/- एवढी रक्कम संबंधित संस्थेस वितरीत करण्याबाबत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास सूचित करण्यात येत आहे.

सदर खर्चास वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग पहिला, उपविभाग तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद क्र. २७ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मान्यता देण्यात येत आहे.

सदर खर्च मागणी क्रमांक झेडई -१ ए, "२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१२) अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी देण्याकरिता अनुदान (२२३५ ए - १८७) या लेखाशिर्षाखाली सन २०११-१२ या वर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(व्यंकटेश भट)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई.
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई.
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर, निवड नस्ती.

सचिव
महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई

महाराष्ट्र शासन

क्रमांक : अविवि-२०१२/प्र.क्र. ५०/का-७
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३१.३.२०१२.

